बुधवार, ३ मे २०२३
⊙ किंमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०२ ⊙ अंक -२३७
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

● MARATHI ● DAINIK ● CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) ● TUESDAY 3 MAY 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-237 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-12 ● PRICE-5

# थांबण्याचा विचार आहे

## शरद पवारांची निवृत्तीची घोषणा



आधुनिक केसरी न्यूज


**राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी अध्यक्षपदावरुन निवृत्त होण्याचा निर्णय घेतला आहे. संघटनेबाबत पुढे काय करायचे याबाबत मी एक समिती स्थापन करणार असून यात सदस्य निर्णय घेतील, असे पवार यांनी सांगितले. प्रफुल्ल पटेल, सुनील तटकरे, दिलीप वळसे पाटील, नरहरी झिरवाळ यांच्यासह प्रमुख नेत्यांनी निर्णय घ्यावा, असे शरद पवार म्हणाले. शरद पवारांचे आत्मचरित्र 'लोक माझे सांगाती' च्या सुधारित आवृत्तीचे मंगळवारी प्रकाशन झाले. त्यावेळी ते बोलत होते. परंतु ते निवृत्त कधी होणार याबाबत त्यांनी सांगितले नाही. शरद पवार म्हणाले, १९९९ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची स्थापना झाली, तेव्हापासून गेली २४ वर्षे राष्ट्रवादी पक्षाचा अध्यक्ष म्हणून काम पाहत आहे. सार्वजनीक जीवनातील १ मे १९६० पासून सुरू झालेला हा संपुर्ण प्रवास गेली ६३ वर्षे अविरत चालू आहे. संसदेतील राज्यसभा सदस्यपदाची पुढील ३ वर्षे शिल्लक आहेत. या काळात राज्याच्या आणि देशाच्या प्रश्नांमध्ये अधिकाधीक लक्ष घालण्यावर माझा भर असेल.**

24 वर्षे मी पक्षाचा अध्यक्ष म्हणून काम करतोय. कुठेतरी थांबायचा विचार सुद्धा केला पाहिजे. माणसाला अधिक मोह असू नये. तुम्हाला अस्वस्थता कदाचित वाटेल. पण राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या अध्यक्षपदावरुन निवृत्त व्हायचा निर्णय मी आज घेतला आहे, असे शरद पवार यांनी म्हणाले. तसेच मी कुठेही असलो तरी सकाळपासून संध्याकाळपर्यंत मी उपलब्ध राहिन हे आश्वस्त करतो. जनतेचे प्रेम आणि विश्वास हाच माझा श्वास आहे, असे शरद पवार निवृत्तीची घोषणा करताना म्हणाले. दरम्यान, शरद पवार यांच्या निवृत्तीच्या घोषणेनंतर वाय बी सेंटरमध्ये उपस्थित राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांकडून जोरदार घोषणाबाजी करण्यासाठी करण्यात आली. शरद पवार यांनी निर्णय मागे घ्यावा, अशी मागणी कार्यकर्त्यांकडून केली जात आहे. महाराष्ट्राचा बुलंद आवाज, शरद पवार, शरद पवार अशी घोषणाबाजी यावेळी करण्यात आली. यावेळी कार्यक्रत्यांना अश्रू देखील अनावर झाले. इतकेच नाही तर धनंजय मुंडे यांनी शरद पवार यांच्या पाया पडून निवृत्तीचा निर्णय मागे घेण्याची विनंती केली. दरम्यान पवारांच्या निवृत्तीच्या घोषणेने ठाकरे गट आणि काँग्रेसची चिंता वाढली आहे. महाविकास आघाडीतले कल्पतरु म्हणून शरद पवारांकडे पाहिले जाते. शरद पवारांच्या आदेशाने महाविकास आघाडीत अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. पवारांच्या घोषणेनंतर महाविकास आघाडीत अस्वस्थता निर्माण झाली आहे. तसेच काही महत्त्वाचे नेते वाय बी चव्हाणला जाण्याची शक्यता आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या अध्यक्षपदावरून निवृत्त होणार, असा निर्णय शरद पवारांनी जाहीर केल्यावर यशवंतराव चव्हाण सभागृह घोषणांनी दणाणले. महाराष्ट्राचा बुलंद आवाज, शरद पवार शरद पवार' अशा घोषणा कार्यकर्त्यांनी दिल्या. तसेच, राष्ट्रवादीचे कार्यकर्ते आणि नेत्यांनी शरद पवार यांना स्टेजवर जाऊन विनवणी केली. आमदार धनंजय मुंडे यांनी शरद पवारांचे पायही धरले. राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, प्रफुल्ल पटेल, अनिल देशमुख, जितेंद्र आव्हाड यांना अश्रू अनावर झाले. यावेळी उपस्थित असलेल्या कार्यकर्त्यांनी सुप्रिया सुळेंना शरद पवारांना समजवण्याची विनंती केली. तेव्हा अजित पवारांनी मध्यस्थी करत, सुप्रिया, तू बोलू नको. तिचा मोठा भाऊ म्हणून अधिकारवाणीने सांगतोय. गप्प बसा बाकीचे, अशा शब्दांत अजित पवारांनी कार्यकर्त्यांना खडसावले आहे.



**आज ना उद्या हा निर्णय होणार होता :** शरद पवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्षपद सोडण्याचा निर्णय घेतल्यानंतर, राजकीय वर्तुळात खळबळ उडाली. राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी तर पवारांनी आपला निर्णय मागे घेण्याचा हट्ट धरला. त्याचवेळी दुसरीकडे अजित पवारांनी कार्यकर्त्यांना मात्र वेगळी भूमीका मांडली. शरद पवार यांच्या मार्गदर्शनाखाली नवा अध्यक्ष काम करेल. कुणी पण अध्यक्ष झाले प्रांताध्यक्ष झाले तरी शरद पवार यांच्याच मार्गदर्शनाखाली हा पक्ष चालणार आहे. हा निर्णय कालच होणार होता मात्र काल 1 मे असल्यामुळे निर्णय जाहीर केला नाही. आज ना उद्या हा निर्णय होणार होता, असे म्हणत अजित पवारांनी भूमिका मांडली आहे.



**'भाकरी फिरवण्याचे संकेत होते :** खासदार संजय राऊत यांनी ट्वीटमध्ये म्हटले आहे की, 'एक वेळ अशी आली की घाणेरडे आरोप, प्रत्यारोप करण्यात आले. राजकाराणाचा उबग येऊन शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी देखील शिवसेना प्रमुख पदाचा राजीनामा दिला होता. राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांनी तेच केले आहे. जनतेच्या रेट्यामुळे बाळासाहेबांना राजीनामा मागे घ्यावा लागला. शरद पवार हे देशाच्या राजकारणाचे आणि समाजकारणाचे श्वास आहेत.' अशा आशयाचे ट्वीट केले आहे. त्याचबरोबर सध्याच्या चर्चेतील एक फोटो ट्वीट करत 'भाकरी फिरवण्याचे संकेत होते.. पण तवाच फिरवला' असे फोटोला कॅप्शन दिले आहे.




**पवारांचे मानाचे स्थान कायम राहिल :** राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवारांनी राष्ट्रवादी पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्ष पदावरून निवृत्त होण्याची घोषणा केली. त्यामुळे राज्याच्या राजकारणात मोठा भूकंप आला असून, त्यांच्या या निर्णयावर अनेक प्रतिक्रिया येत आहे. दरम्यान यावरच काँग्रेसचे नेते तथा माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांची प्रतिक्रिया देखील समोर आली आहे. राष्ट्रवादी पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्ष पदावरून निवृत्त होण्याचं शरद पवार यांचा निर्णय वैयक्तिक आहे. मात्र राजकारणातील पवारांचे मानाचे स्थान कायम राहिल, अशी प्रतिक्रिया पृथ्वीराज चव्हाण यांनी दिली आहे.

# प्रत्येक जिल्ह्यात कामगार भवन, कामगारांसाठी स्वतंत्र रुग्णालये

## कामगार मंत्री सुरेश खाडे

आधुनिक केसरी न्यूज



**पुणे :** आंतरराष्ट्रीय कामगार दिनाच्या निमित्ताने पिंपरी चिंचवडमध्ये राज्यस्तरीय कामगारांचा सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमासाठी कामगार मंत्री सुरेश खाडे उपस्थित होते. याच कार्यक्रमात कामगार मंत्र्यांनी अनेक महत्त्वाच्या घोषणाही केल्या आहेत. यावेळी प्रत्येक जिल्ह्यात कामगार भवन, कामगारांसाठी स्वतंत्र रुग्णालये, प्रत्येक तालुक्यात सेतू केंद्र, चौकाचौकात कामगार नाका शेडची उभारणी करण्यार असल्याचं कामगार मंत्री सुरेश खाडे यांनी जाहीर केले. तसेच उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्यांना राज्यस्तरीय पुरस्कारांची घोषणाही या कार्यक्रमात करण्यात आली. यावेळी पत्रकारांनी कामगार भरती प्रक्रियेबाबत, बरसू रिफायनरी प्रकल्प, फॉक्सकॉन प्रकल्प याअनुषंगाने विचारलेल्या प्रश्नांना उत्तरंही सुरेश खाडे यांनी दिली.

कार्यक्रमात बोलताना राज्याच्या अर्थव्यवस्थेत कामगार महत्त्वाचा घटक असून कामगारांच्या कल्याणाला राज्य शासनाचे प्राधान्य आहे. राज्यातील सर्व कामगारांना योजनांचा लाभ मिळावा म्हणून प्रत्येक तालुक्यामध्ये सर्व प्रकारच्या कामगार नोंदणीसाठी कामगार सेतू नोंदणी केंद्र, नाक्यावरील कामगारांकरीता कामगार निवारा उभारणार असल्याचे कामगार मंत्री डॉ. सुरेश खाडे यांनी सांगितलेआहे. मंत्री सुरेश खाडे बोलताना म्हणाले की, कामगारांची किंमत ही खऱ्या अर्थाने कोरोना काळात सर्वांनाच समजली. प्रत्येक जिल्ह्यात 'कामगार भवन' बनवण्याची घोषणा मी आज करतोय. कामगारांच्या आरोग्यासाठी राज्यात सहा रुग्णालयं उभारली जाणार आहेत. काम करताना अनेक कामगार जखमी होतात, त्यांच्यावर उपचारासाठी ही रुग्णालय उपयोगी पडतील. तसेच, प्रत्येक तालुक्याला सेतू केंद्र सुरू करतोय, तिथे कामगारांच्या सर्व नोंदीसाठी त्यांना मदत होईल. चौकाचौकात उभे राहणाऱ्या कामगारांसाठी नाकाशेड उभारले जाणार आहे, जेणेकरून काम मिळेपर्यंत ते त्या शेडमध्ये उभे राहतील.

कामगारांचा अपघात झाल्यावर त्यांचा कुटुंबाला आर्थिक मदत मिळण्यासाठी विमा कंपनीबाबत योजना तयार करण्यात येत आहे. सुरक्षा मंडळातील कर्मचारी, अर्धवेळ काम करणाऱ्या कामगाराला एक हजार रुपये वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे, असेही सुरेश खाडे यांनी बोलताना सांगितले. पुढे बोलताना कामगारांना शासनाच्या योजनांची माहिती देणाऱ्या पुस्तिकेचे अनावरण करण्यात आले असून ही पुस्तिका सर्व तालुक्यात पोहोचविण्यात यावी. कामगारांना आवश्यक त्या सर्व सोई-सुविधा उपलब्ध करुन देणार असून याकरिता या क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्तींकडून सल्ला घेण्यात येईल. प्रामाणिकपणे काम करा, उद्योगवाढीसाठी प्रयत्न करा. उद्योग टिकला तर कामगार टिकेल असा संदेश देत त्यांनी कामगारांना नोंदणी करण्याचे आवाहनही मंत्री सुरेश खाडे यांनी केले.


# बजरंग दल, पीएफआयसारख्या संघटनांवर बंदी घालणार

## कर्नाटक निवडणुकीसाठी काँग्रेसचा जाहीरनामा प्रसिद्ध


आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** कर्नाटक विधानसभा निवडणूक अगदी काही दिवसांवर येऊन ठेपली आहे. यासाठी सर्वच पक्षांकडून प्रचाराचा धडाका सुरू आहे. दरम्यान या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर दोन दिवसांपूर्वी भाजपाने आपला जाहीरनामा प्रसिद्ध केला होता. त्यापाठोपाठ आता काँग्रेसनेही आपला जाहीरनामा प्रसिद्ध केला आहे. कर्नाटकरमध्ये सत्ता आल्यास बजरंग दल आणि पीएफआयसारख्या संघटनांवर बंदी घालू, असे आश्वासन या जाहीरनाद्वारे देण्यात आले आहे.

कर्नाटकमधील मतदारांना आकर्षित करण्यासाठी काँग्रेसकडून अनेक महत्त्वाच्या घोषणा करण्यात आल्या आहेत. काँग्रेस पक्षाने कर्नाटकमध्ये सरकार आल्यास बजरंग दल आणि पीएफआयवर बंदी घालण्याचे आश्वासन दिले आहे. तसेच प्रत्येक कुटुंबाला २०० युनिट मोफत वीज देण्याचे आश्वासनही काँग्रेसकडून देण्यात आले आहे. याबरोबरच कुटुंबातील प्रत्येक महिलेला दरमहा दोन हजार रुपये आणि महिलांसाठी राज्य सरकारी बसमध्ये मोफत प्रवासाची घोषणा या जाहीरनाम्यात करण्यात आली आहे. याशिवाय तरुण मतदारांना आकर्षित करण्यासाठी बेरोजगार पदवीधरांना दरमहा तीन हजार रुपये देण्याची घोषणाही या जाहीरनाम्याद्वारे करण्यात आली आहे. दरम्यान, काँग्रेसच्या या जाहीरनाम्यावर भाजपा आणि बजरंग दला आणि विश्वहिंदू परिषदेने आक्षेप घेतला आहे. बजरंग दलाची तुलना पीएफआय सारख्या दहशतवादी संघटनेशी करणे हे दुर्दैवी आहे. आम्ही यासंदर्भात आम्ही काँग्रेसला कायदेशीर उत्तर देऊ, अशी प्रतिक्रिया विश्वहिंदू परिषदेचे नेते सुरेंद्र जैन यांनी दिली.







विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932




# सिंगापूरचा भाग्यविधाता - ली क्वान यू

आधुनिक केसरी

सिंगापूरला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर पहिल्या पंतप्रधानपदाची जबाबदारी ली यांच्यावर आपसूकच आली. आधीपासून ते लोकांच्या समस्या सोडवणारे नेते होतेच. केम्ब्रिजमधून कायद्याची पदवी गुणवत्तेसह उत्तीर्ण झालेल्या ली यांनी काही काळ वकिलीही केली. पण नंतर स्वतंत्र झालेल्या सिंगापूरसाठी स्वतःला वाहून घेतले. सिंगापूरच्या प्रगतीसाठी काय करता येईल, त्याला जागतिक स्तरावर एक राष्ट्र म्हणून मानाचे स्थान कसे प्राप्त करून या विचारांनी त्यांना पछाडले होते. सिंगापूरसमोर अनेक समस्या आ वासून उभ्या होत्या. शेतीसाठी पुरेशी सुपीक जमीन नव्हती, नैसर्गिक साधनसंपत्तीचा अभाव होता. गरिबी, अस्वच्छता, भ्रष्टाचाराने देश बरबटलेला होता. विविध वंशीय आणि विविध भाषा बोलणारे लोक सिंगापूरमध्ये स्थायिक झाले होते. पण ली यांनी धैर्याने या सगळ्या संकटांचा सामना करायचे ठरवले. एकेक पाऊल ते विश्वासानं आणि निर्धारानं टाकत गेले. सिंगापूरवासी नागरिक मेहनती होते. पण या विविध धर्म, वंशाच्या लोकांना एकत्र आणणे, त्यांच्यात राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण करणे सोपे नव्हते. त्यासाठी ली यांनी वेगळ्या विचारांची वाट निवडली. ते सुरुवातीला डाव्या विचारसरणीचे असले तरी पुढे त्यांनी आपल्या विचारसरणीत बदल घडवून आणला. साम्यवादी विचारांची कास धरून आपल्याला चालणार नाही हे त्यांच्या लक्षात आले. लोकांमध्ये प्रबोधन घडवून त्यांच्या विचारसरणीत हळूहळू बदल घडवून आणावा लागेल असे त्यांना वाटत होते. ली तसे उच्चभ्रू ब्रिटिश संस्कृतीत वाढले होते. पण परिस्थितीनुसार ते स्वतःमध्ये बदल घडवत गेले. बिअर आणि गोल्फ या दोन ली यांच्या आवडीच्या गोष्टी. जीवनाचा आनंद घेणे, नियमित व्यायाम करून आपले शरीर आणि मन तंदुरुस्त ठेवणे आणि सकारात्मक विचार करणे या गोष्टींवर त्यांचा भर होता. गोल्फच्या खेळात खेळताना मैदानावर असलेल्या छोट्याशा खळग्यात आपल्या हातात असणाऱ्या दांडीवजा बॅटने चेंडू टोलवायचा असतो. तो खळग्यात किंवा जास्तीत जास्त खळग्यांजवळ जाईल अशा कौशल्याने खेळ खेळावा लागतो.



# आनंदी पहाट

## जगण्यापलीकडचे जीवन

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

आपल्या अंतर्मनाला समाधान देऊ करणाऱ्या अशा सर्वच आठवणींची साठवण आपण केली पाहिजे. एक वेगळीच आनंद निर्मिती आणि तीही आपल्याच अंतर्मनात, अंतरंगात करण्याचं काम ह्या सुखद, आनंददायी आठवणी करत असतात. तसं घडलंच पाहिजे. आपण आणि इतरांनी परिधान केलेले कपडे, वापरलेल्या वस्तू, आपापसांत झालेला संवाद, घडलेल्या गप्पागोष्टी, त्या दरम्यानच्या शारीरिक हालचाली, आपापले हावभाव अशा अनेकविध गोष्टीआठवायला सुरुवात होते. ह्या आठवणींचं आपल्याशी एक जिव्हाळ्याचं नातंच निर्माण झालेलं असतं. आपलं जगण्यापलीकडचं जीवन आनंदायी करण्याचं काम अनेकदा ह्या अशा आठवणीच करत असतात. काही आठवणी तर रात्री झोपेत आपल्याला पडलेल्या स्वप्नांच्या असतात. काहीवेळा तर ह्या आठवणीमध्ये आपण इतके रममाण झालेले असतो, कि वास्तवातले आणि वर्तमानातले कित्येक क्षण आपलं फक्त शरीर प्रचीती घेत असतं, पण मनाला त्याची अनुभूतीच मिळत नसते. आपल्या गत आयुष्यात रममाण व्हायला आपल्याला प्रत्येकालाच हवं असतं, ते अधिक प्रियही असतं. आपल्या प्रत्येकाच्याच साठवणीतल्या अनेक आठवणी असतात. हर्षाच्या-स्पर्शाच्या, घरच्या-दारच्या, प्रीतीच्या-मैत्रीच्या, स्पर्धेच्या-बक्षिसांच्या, शाळेच्या-कॉलेजच्या, बालपणीच्या-तारुण्याच्या; अशा एक नाही तर अनेकविध आठवणीत आपल्या अंतर्मनाला सुखावण्यासाठी अनेकदा त्या आपण स्मरत असतो. ह्यांत ाही आठवणी सुखाच्या-दुःखाच्या, रागाच्या-वादाच्या, विरहाच्या- प्रहाराच्या, प्रयासाच्या-त्रासाच्या, मानाच्या-अपमानाच्या अशा मिश्र स्वरूपाच्याही असतात. कोणत्या आठवणी आपल्या अंतर्मनासमोरून कधी तरळून जातील, हे काही ठरलेलं अथवा आपण ठरवलेलं नसतं. अनेकदा काही घटना आपण कितीही आठवायच्या ठरवल्या तरीही नीट, पूर्णपणे आठवता येतातच असं नाही; तर काही घटना मात्र अनावधानानं, आपोआप आपल्या डोळ्यासमोर पुनःश्च यायला लागतात. खरंच, ह्या मनाचं नेमकं काय रसायन आहे, आपल्याला काही कळत नाही.



आधुनिक केसरी

### तोचि अद्वैतीचा | आत्माराम ||

आता मजवरी | कृपा करा हरि ||
नाम निरंतरी | मुखी यावे ||१||
त्रासला हा जीव | भोगोनी यातना ||
भाळीचा संपेना | वनवास ||२||
सुखाचे सोहळे | दिंडीत पाहिले ||
भान हरपले | भजनात ||३||
भगवी पताका | डोलता अंबरी ||
अभंग अंतरी | नाचू लागे ||४||
लागता रे छंद | हरिच्या नामाचा ||
तोचि अद्वैतीचा | आत्माराम ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

# निरुपण

आधुनिक केसरी



डॉ. चन्द्रहासशास्त्री
सोनपेठकर

**विश्वसेद् भगवन्तं च**
**श्रीगुरुं पितरौ तथा।**
**स्वं च नृणा सदा तस्मात्**
**स्वयमायाति तं सुखम्।**
**माणसाने नेहमी भगवंत,**
**श्रीगुरु, आईवडील आणि स्वतः वर**
**विश्वास ठेवावा.**
**त्यामुळे सुख स्वतःहून**
**त्याचेकडे येते.**

# घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !



स्वर्वेद रचनाकार
अनन्त श्री सद्गुरू
सदाफल देवजी
महाराज

**भूमण्डल समराट है,**
**चक्रवर्त सुखसाज ।**
**मृगतृष्णा फिर दौड़तै, दुखद पिशाच**
**समाज ।।३३।।(स्वर्वेदपंचम मण्डल**
**एकादश अध्याय) ०५/११/३३**
**मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :**
भूमंडळातील सुसज्जित असे चक्रवर्ती सुख-साम्राज्य प्राप्त करूनही जो मृगतृष्णे समान पुन्हा धावतो आहे, तो नर-पिशाच्च, निधर्मी जगाला दुःख देणारा आहे.

**संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सॲप करा ८५५४८८३१६६.**

# सूक्ष्म आशंका निरुपण

आधुनिक केसरी



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646


शास्त्रे,पुराणे,नानाविध तत्वचिंतक समाजासमोर मोठ्या पोटतिडकीने सांगतात की माया ही मिथ्या आहे. आपण आरशात स्वतः चेच प्रतिबिंब पहातो.म्हणजे आपण जसे आहोत तशीच आपली प्रतिमा असणार, मायेच्या बाबतीतही तसेच होते मायेविषयीज्याची जशी भावना अआहे तसेच त्याला वाटणार.तशीच माया त्याला दिसणार. त्याचप्रमाणे ब्रम्ह स्वरूपाचे वर्म ज्याला कळले नाही त्याच्या अंतरंगातील भ्रम अजून गेलेला नाही. देव एकमेव व अद्वितीय आहे. त्याच्या वाचून दुसरे सत्य काही नाही. म्हणजेच सर्व काही ब्रम्ह आहे व ते ब्रम्ह म्हणजेच देव आहे. सद्वस्तु एकच आहे हे जेवढे खरे तद्वतच सदवस्तुवाचून दुसरे काही यत्किंचितही खरे नाही. "देव कसा ओळखावा ? मित्रांनो आपल्याला आपल्याच प्रश्नाचे उत्तर आता मिळाले आहे. जर सदवस्तु एकच आहे हे जेवढे खरे तर सगळे ब्रम्हस्वरूपातचं आहे हे सिध्द होते. तेव्हा वेगळे सिध्द करण्याची जरूरी नाही. शास्त्राच्या वाक्याचा अर्थ घेऊन तत्वचिंतक सांगतात की,"सगळेच्या सगळे द्रुष्य जर मिथ्या आहे तर मिथ्या जाऊन जे शिल्लक रहाते ते ब्रम्ह तेवढे खरे होय. सोने काय,किंवा चांदी काय ते स्थुल रूपात असले काय किंवा दागिन्यांच्या रूपात असले काय त्याचे मुळ गुणधर्म एकच आहेत. त्याच प्रमाणे ब्रम्ह आणि जगत् यांच्यात मुळ भेद नाही. त्यामुळे निव्वळ.

# संतांना कसे ओळखावे ?

आधुनिक केसरी

धान्यामध्ये काही खडे असे असतात की, धान्यापासून ते वेगळे निवडता येत नाहीत. तांदळांत पांढरे खडे असतात, ते निवडू गेले तरी निवडले जात नाहीत. त्याप्रमाणे साधू लोक हे आपल्यात असतात, त्यांना पाहू गेले तर ते आपल्यासारखेच संसारात वावरत असलेले दिसतात; पण खरे पाहता ते आपल्यापेक्षा वेगळे असतात. पुस्तकांतून साधूची लक्षणे पुष्कळ दिलेली असतात. पण त्याप्रमाणे आपण पाहू गेलो तर साधू ओळखता येईलच असे नाही. साधूचे एकच अचूक लक्षण सांगता येईल, ते हे की, जो सर्व ठिकाणी देवाला पाहू शकतो तो साधू. पण एवढ्यावरून आपल्याला तो ओळखता येईल का ? नाही; तर जेव्हा आपण साधू व्हावे, तेव्हाच आपल्याला साधूला ओळखता येईल.

जगात आपण कुणाचीच निंदा करू नये. आपण जेव्हा दुसऱ्याचे दोष पाहतो, म्हणजेच ते जेव्हा त्याच्याजवळ आहेत असे दिसतात, त्या वेळेस तेच दोष आपल्याजवळ सूक्ष्म रूपाने असतात असे समजावे; आणि आपण लगेच देवाला



शरण जाऊन, ‘हे माझे दुर्गुण काढून टाक’, म्हणून त्याची करुणा भाकावी, आपण जेव्हा ‘जगात न्याय उरला नाही’ असे म्हणतो, त्या वेळेस आपल्याजवळ तो दोष आहे समजावे. म्हणून आपण कुणाचे दोष पाहू नयेत. आपण आपल्या स्वतःला आधी सुधारावे. चित्तशुद्धी केल्याशिवाय आपल्या मनात सर्व ठिकाणी भगवद्भाव उत्पन्न होणार नाही. म्हणून जेव्हा जेव्हा आपल्याला दुसऱ्याचे दोष दिसतात, तेव्हा आपलेच चित्त अशुद्ध आहे असे समजून आपण परमात्म्याची करुणा भाकून त्याला शरण जावे, आणि ‘माझे चित्त शुद्ध कर’ अशी त्याला विनंती करावी. असे केले म्हणजे आपले चित्त शुद्ध होत जाते, आणि मग भगवंताची प्राप्ती व्हायला वेळ लागत नाही. जे मिश्रण आहे ते पचायला कठीण असते; उदाहरणार्थ, भाजणी. मिश्रण नसलेले एकच शुद्ध अन्न पचायला सोपे असते. हे जसे खरे, त्याचप्रमाणे आपले अंतःकरण अगदी शुद्ध असावे, म्हणजे ते सर्वांमध्ये लवकर मिसळते. पण आपल्या अंतःकरणामध्ये स्वार्थाचे मिश्रण असल्यामुळे ते सर्वांमध्ये समरस होऊ शकत नाही. शुद्ध अंतःकरणाच्या माणसाचे चालणे हळू, आणि बोलणे मृदू असते. तो सर्वांना प्रिय होतो. जगातले आपले समाधान किंवा असमाधान, ज्या वृत्तीने आपण जगाकडे पाहतो त्यावर अवलंबून असते. ‘माझ्याकरिता मी नसून, मी लोकांकरिता आहे. माझ्याकरिता जग नसून मी जगाकरिता आहे,’ ही वृत्ती आपण ठेवावी.

**आजचे बोधवचन आहे – सर्व चराचर भगवद्रूप जो पाहतो तो साधू. श्रीराम समर्थ**

# निवडक सुभाषिते

आधुनिक केसरी

**पातु वो निकपग्रावा मतिहेम्नः सरस्वती ।प्राज्ञेतरपरिच्छेदं वचसैव करोति या ॥ स्पष्टीकरण – समोरचा मनुष्य पंडित आहे, शहाणा आहे, की मूर्ख आहे, ते समजायला वेळ लागत नाही. त्याने बोलायला सुरुवात केली, की ते आपोआप कळून येते. हा या सरस्वतीचा प्रभाव होय. बहाणा का मूर्ख ते ठरविण्याची ती कसोटीच आहे. सरस्वती ही विद्येची देवता आहे. म्हणून गणपतीनंतर तिला वंदन करणे क्रमप्राप्त आहे.**

**पं. महादेवशास्त्री जोशी, पुणे**

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
बुधवार, ३ मे २०२३
adhunikkesari.com Adhunik Kesari

## फडणवीसांचा दौरा रद्द

आधुनिक केसरी न्यूज

**वर्धा :** मंगळवारी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस वर्धा दौऱ्यावर येणार म्हणून प्रशासनाने जय्यत तयारी केली होती. पोलिसांचा कार्यक्रम असल्याने पोलीस अधीक्षक कार्यालय सज्ज झाले होते. पण तेवढ्यात संदेश उमटला दौरा रद्द काय झाले नेमके, तर हवामान आडवे आले.

गडचिरोली लगत फडणवीस मुक्कामी होते. तिथे घनगर्द आभाळ, पावसाचे आगमन व अपुरा प्रकाश यामुळे हेलिकॉप्टर चालकांनी हवामानाचा दाखला देत उपमुख्यमंत्र्यांना उड्डाण शक्य नसल्याचे विनम्रपणे सुचविले. त्याचा तात्काळ स्वीकार करीत उड्डाण प्रवास रद्द करण्याचा निर्णय उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी घेतला. मात्र थांबणे शक्य नव्हते. म्हणून मोटारीने नागपूरला व नंतर मुंबईस जाण्याचा निर्णय त्यांनी घेतला. मुंबई व गोवा बार कौन्सिलचा हीरक महोत्सवी कार्यक्रम मुंबईत असल्याने त्यांनी तडकाफडकी गडचिरोली सोडले. पण इथे वर्धेत मात्र दौरा रद्द झाल्याने अधिकाऱ्यांनी सुटकेचा निःश्वास टाकल्याचे दिसून आले. तर तयारी फसल्याने अनेकांचा हिरमोड झाला.




# केंद्र व राज्य सरकार यांनी कामगार विरोधी धोरण मागे घ्यावे : भारतीय मजदूर संघ

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** केंद्र व राज्य सरकारची सध्या ची धोरणे पुर्ण पणे कामगार विरोधी असून सदरची धोरणे त्वरित मागे घ्यावे अशी मागणी भारतीय मजदूर संघ पुणे जिल्हा च्या वतीने जिल्हाधिकारी पुणे कार्यालया समोर झालेल्या निर्दशने करून निवेदन देण्यात आले.

शासनाने कामगार विरोधी तरतूदी मागे न घेतल्यास रस्ता वर उतरून तीव्र आंदोलन करण्याचा ईशारा भारतीय मजदूर संघाचे राष्ट्रीय पदाधिकारी, व उद्योग प्रभारी चंद्रकांत धुमाळ यांनी जिल्हाधिकारी कार्यालय पुणे दिला आहे

भारतीय मजदूर संघाने राज्य सरकारचे लक्ष वेधण्यासाठी कामगारांचे ज्वलंत प्रश्न ,कंत्राटी कामगारांचे होणारे पिळवणूक शासनाकडे मागण्या करिता, प्रलंबित किमान वेतनाच्या वाढी करिता, आंगणवाडी, आशा वर्कर्स, घरेलु कामगार, बांधकाम कामगारांना आर्थिक लाभ ई मागण्या घेवून शिवनेरी ते आझाद मैदान अशी चेतना यात्रा व हजारो कामगारांनी आझाद मैदानावर मोर्चा काढला होता. पण यांची दखल घेतली नाही. त्यामुळे भारतीय मजदूर संघाचे २०वे त्रैवार्षीक अधिवेशन पाटणा बिहार येथे ७ ते ९ एप्रिल २३ रोजी संपन्न झाले. या अधिवेशनात देशभरातील ५५० जिल्हा मधून २५०० पदाधिकारी उपस्थित होते. या वेळी चार ठराव पारित करण्यात आले. सदरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासाठी देशातील जिल्हा स्थानी निदर्शने करून ठरावाच्या प्रती मा जिल्हाधिकारी यांच्या मार्फत मा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पाठविण्यात आले आहे.

**महत्वपूर्ण मागण्या**

1 ) सर्व संघटित व असंघीटत क्षेत्रातील कामगारांना सामाजिक सुरक्षा कायदा लागू करा.

2 ) कंत्राटीकरण, खाजगीकरण, निगमीकरण,इ त्वरित थांबविण्यात येवुन या ठिकाणी कार्यरत कंत्राटी कामगारांना कायम नोकरीत मध्ये समाविष्ट करावेत .

3 ) किमान वेतन च्या ऐवजी जिवन वेतन( Living wage ) लागु करा. 4 ) देशाच्या आर्थिक विकासासाठी राष्ट्रीय श्रम निती तयार करा. 5 ) ई पी एफ मधील सभासदांना दरमहा रू 5000 ( पाच हजार ) व महागाई भत्ता देण्यात यावे.

6 ) केंद्र व राज्य सरकार मधील कर्मचारी ना जुनी पेंशन योजना लागु करावी.

7 ) करोना कालावधीत आरोग्य विभाग मध्ये काम केलेल्या सर्व कामगारांना नोकरीत समाविष्ट करावेत.

वरील प्रमुख मागण्यांचे निवेदन मा निवासी जिल्हाधिकारी ज्योती कदम यांना देण्यात आले या वेळी भारतीय मजदूर संघ पुणे जिल्हा अध्यक्ष अर्जुन चव्हाण, सेक्रेटरी बाळासाहेब भुजबळ, विराज टिकेकर, संदिप लोणारी, गणेश टिंगरे, अण्णा महाजन, विवेक ठकार, कस्तुरी बडगु, हे उपस्थित होते.

या अखिल भारतीय ठेका मजदूर महासंघाचे सरचिटणीस सचिन मेंगाळे, तुकाराम डिंबळे,उमेश आणेराव, सुरेश जाधव,उमेश विस्वाद, बाळासाहेब पाटील लता ढगे यांनी मार्गदर्शन केले वेळी विविध ऊद्योगातील संघटीत असंघीटत क्षेत्रातील पदाधिकारी उपस्थित होते.




## उद्यापासून सिंहगड एक्स्प्रेसचे डबे वाढणार

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** मुंबई प्रवास करणाऱ्यांची संख्या मोठी आहे. त्यामुळे मागील काही दिवसांपासून मुंबई-पुणे सिंहगड एक्स्प्रेसमध्ये मोठ्या प्रमाणात गर्दी होत होती. त्यावरुन प्रवासांची भांडणेदेखील झाली. या भांडणाचे व्हिडीओदेखील व्हायरल झाले होते. त्यामुळे प्रवाशांनी कोच वाढवण्याची मागणी केली होती. त्यामुळे आता मध्य रेल्वेने मुंबई-पुणे सिंहगड एक्स्प्रेसला सेकंड क्लास चेअर कोच लावण्याचा निर्णय घेतला आहे.

मुंबई-पुणे सिंहगड एक्स्प्रेसचा हा नवा कोच नॉन एसी कोच असणार आहे. या मार्गावरून प्रवास करणाऱ्या प्रवाशांच्या वाढत्या मागण्या पूर्ण करण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे आता मुंबई-पुणे सिंहगड एक्स्प्रेसला 16 कोच असणार आहे. या ट्रेनची बुकिंग करण्यासाठी आता रेल्वे प्रशासनाकडून आवाहन करण्यात आले आहे.

## गांधीजींचे नातू अरुण गांधी यांचे निधन

### वयाच्या 89 व्या वर्षी घेतला अखेरचा श्वास

आधुनिक केसरी न्यूज

**कोल्हापूर :** लेखक आणि महात्मा



गांधी यांचे नातू अरुण गांधी यांचे कोल्हापुरात निधन झाले आहे. वयाच्या 89 व्या वर्षी अखेरचा श्वास घेतला. सामाजिक-राजकीय कार्यकर्ते असलेले अरुण गांधी यांच्या पार्थिवावर आज कोल्हापुरात अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत, असे त्यांचे पुत्र तुषार गांधी यांनी पीटीआय वृत्तसंस्थेशी बोलताना सांगितले. तुषार गांधी हे कोल्हापूरकडे रवाना झले आहेत. अरुण गांधी यांचे गेल्या दोन महिन्यांपासून कोल्हापुरात वास्तव्य होते. अरुण गांधी हे मणिलाल गांधी यांचे पुत्र आहेत. 14 एप्रिल 1934 रोजी डर्बनमध्ये त्यांचा जन्म झाला होता. ते त्यांचे आजोबा महात्मा गांधी यांच्या पावलावर पाऊल ठेवत सामाजिक कार्यात सक्रिय होते. अरुण गांधींचे द गिफ्ट ऑफ अँगरः अँड अदर लेसन्स फ्रॉम माय ग्रन्डफादर महात्मा गांधी हे पुस्तक प्रसिद्ध आहे. अरूण गांधी हे काही वर्षापूर्वी अमेरिकेत वास्तव्यास होते. महात्मा गांधीप्रमाणे ते अहिंसेच्या मार्गाचे पालन करत असे. यासाठी त्यांनी क्रिश्चियन ब्रदर्स युनिव्हर्सिटीमध्ये अहिंसेशी संबधित एक संस्था स्थापन केली होती. अरुण गांधी हे महात्मा गांधींचे दुसरे पुत्र मणिलाल गांधी यांचे पुत्र होते. मणिलाल गांधी हे अखबार इंडियन ओपिनिअन संपादक होते. त्यांची आई या वृत्तपत्राच्या पब्लिशर होत्या. अरुण गांधींचे द गिफ्ट ऑफ अँगरः अँड अदर लेसन्स फ्रॉम माय ग्रन्डफादर महात्मा गांधी हे पुस्तक प्रसिद्ध आहे. अरूण गांधी हे काही वर्षापूर्वी अमेरिकेत वास्तव्यास होते. महात्मा गांधीप्रमाणे ते अहिंसेच्या मार्गाचे पालन करत असे. यासाठी त्यांनी क्रिश्चियन ब्रदर्स युनिव्हर्सिटीमध्ये अहिंसेशी संबधित एक संस्था स्थापन केली होती.

# 'मन की बात' म्हणजे जनतेच्या पैशाची उधळपट्टी

## काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांचा आरोप

आधुनिक केसरी न्यूज

**गोंदिया :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'मन की बात ' कार्यक्रमाकरिता केली जाणारी जाहिरात शासकीय धनाची बरबादी आहे. ही देशातील गोर गरीब जनतेच्या घामाच्या पैशाची उधळपट्टी आहे, असा आरोप काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केला आहे. पंतप्रधान मोदींनी ' मन की बात ' ऐवजी आता जन की बात करायला हवी , ज्यांना या देशाची लोकशाही मान्य नसेल ते आपल्या 'मन की बात ' बोलतात आणि त्याचाच प्रत्यय आपल्या देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदींचा माध्यमातून बघायला मिळत आहे. लोकशाही मध्ये जनतेच्या मनातला एकून सत्तेमध्ये ज्या लोकांना जनतेने बसविलेला आहे त्या लोकांनी जनतेसाठी काम करावं ही लोकशाही,पण नोटबंदी, जीएसटी सारखं निर्णय आणि सातत्याने वाढलेली बेरोजगारी, महागाई, शेतकऱ्यासाठी आणलेले तीन काळे कायदे, देशातील सार्वजनिक उपक्रम विक्री करून देश चालविण्याचा पाप केलं जात आहे आणि वरुन शासकीय धनाची उधळण करून ' मन की बात ' सांगून देशाच्या लोकांना भूलथापा देण्याचं काम केलं जात आहे. त्याच्यामुळे ते स्वतः हुन किती ही वाहवाही करो, सुरुवातीला त्यांच्या 'मन की बात ' एकायला लोकांची उत्सुकता



दिसायची,पण कालांतराने त्यांची ही 'मन की बात ' ऐकणे आता लोकांना कंटाळवाणा वाटू लागल्यामुळे एकने बंद केले आहे. त्यामुळे आता 'मन की बात ' ची एक आठवडा पूर्वी पासून जाहिरात करावी लागत आहे. आणि ती जाहिरात पण जनतेच्याच पैशांनी, अखेर 'मन की बात ' हा शासकीय कार्यक्रम आहे.

जनतेच्या घामाच्या पैशातून हा कार्यक्रम केला जातो. आणि जेव्हा जनतेच्या घामाच्या पैशाची अशी ही उधळपट्टी केली जात असेल तर यातून जनतेला काय मिळाले असेल. या १०० व्या 'मन की बात ' मध्ये प्रश्न आपण विचारलं तर यातून जनतेला शून्य मिळालेले असल्याचे निष्पन्न होईल, अशी टीका पटोले यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींचा १०० व्या 'मन की बात ' कार्यक्रमाचा मोठा गाजावाजा केल्या वरुन केली.

# बृजभूषण यांचे आवाहन

आधुनिक केसरी

लैंगिक शोषणाचे आरोप झाल्याने वादात अडकलेले अखिल भारतीय कुस्ती महासंघाचे अध्यक्ष बृजभूषण सिंह यांनी आता कुस्तीगीर मल्लांना हात जोडून आवाहन करत हवे तर मला फासावर लटकवा असे म्हटले आहे. २३ एप्रिल पासून हे सगळे कुस्तीगीर आंदोलनाला बसले आहेत. तसेच बृजभूषण सिंह यांची पदावरून हकालपट्टी करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. त्यांच्या या आंदोलनाला काँग्रेससह इतर विरोधी पक्षांनी पाठिंबा दिला आहे. तुमच्यामुळे खेळ थांबला आहे, कुस्ती थांबली आहे. चार महिने सराव थांबला आहे तो सुरु करण्यात यावा. हवे तर मला फासावर लटकवा पण खेळ सुरु होईल असे पाहा. मी कुस्तीगीरांना हे आवाहन करतो आहे की ज्युनियर मल्लांचे आणि इतर मल्लांचे नुकसान करू नका. जे टुर्नामेंट करायचे आहेत ते तुम्ही करा किंवा सरकारने करावी किंवा फेडरेशनने खेळ पुन्हा सुरु करावा. चार महिने मल्लांचे नुकसान होते आहे हे लक्षात घ्या. मला हवे तर फासावर लटकवा पण या लहान मुलांच्या भवितव्याशी खेळ करु नका. जे आत्ता ज्युनिअर आहेत त्यांच्या हातातून खेळाची एक संधी निघून जाईल ते होऊ देऊ नका. असे म्हणत ब्रिजभूषण सिंह यांनी कुस्तीगीरांना आवाहन केले आहे. यानंतर ब्रिजभूषण सिंह पुढे म्हणाले की लवकरच खरे काय आणि खोटे काय ते समोर येईल. पोलिसांच्या अहवालाची थोडी वाट बघू. भारतीय कुस्ती महासंघाचे अध्यक्ष तीन महिन्यात दुसऱ्यांदा कुस्तीगीरांच्या निशाण्यावर आले आहेत. या सगळ्या कुस्तीगीरांनी भारताला आंतरराष्ट्रीय स्तरावर पदके मिळवून दिली आहेत. हे सगळे कुस्तीगीर आता जंतरमंतर या ठिकाणी धरणे आंदोलन करत आहेत. यामध्ये विनेश फोगाट, बजरंग पुनिया, साक्षी मलिकसह अनेक महत्त्वाचे कुस्तीगीर आहेत. २३ एप्रिलपासून कुस्तीगीर दुसऱ्यांदा आंदोलन करत आहेत. काही दिवसांपूर्वीच प्रियंका गांधींनी या आंदोलकांची भेट घेतली. तर सोमवारी नवजोत सिंग सिद्धू यांनी या कुस्तीगीरांची भेट घेतली. या सगळ्यांना प्रचंड पाठिंबा मिळतो आहे. तसेच तपास समितीवरही या सगळ्यांनी प्रश्न उपस्थित केले आहेत.

# महाराष्ट्राचा वैभवशाली इतिहास जपला जावा!



श्रीकृष्णदास निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**हो, आपण ते करतही आहोत. परंतु माझ्या महाराष्ट्रात स्त्रियांचा अनादर, बलात्कार, जातीधर्माच्या भिंती, भ्रष्टाचार, खून, चोऱ्या, आदी कलंकित करणाऱ्या गोष्टींना अजूनही पाहिजे तशी खीळ बसलेली नाही, हे मान्य करावेच लागते. महाराष्ट्राचे गौरवगान ऐकले तर माना इंचभर उंच होतात, मात्र या गोष्टी मनात आल्याबरोबर उंच माना आपोआपच खाली लुडकतात. याची आम्हाला खरेच लाज वाटायला हवी. श्री कृष्णकुमार निकोडे गुरूजी यांचा हा डोळ्यात झणझणीत अंजन घालणारा लेख...**

संत निवृत्तीनाथ, संत ज्ञानेश्वर, संत मुक्ताबाई, संत नामदेव, संत तुकाराम, संत रामदास, संत गोरा कुंभार, संत सावतामाळी, संत नरहरी सोनार, सेना महाराज, संत जनाबाई, संत चोखामेळा, संत कान्होपात्रा, संत एकनाथ, संत गाडगेबाबा, संत तुकडोजी महाराज अशा संतांच्या मांदियाळीने महाराष्ट्रीयन मनाचे संवर्धन तथा पोषण करण्याचा प्रयत्न केला. सामाजिक विचार रुजविण्याचा प्रयत्न केला. महात्मा फुले, सावित्रीमाई फुले, फातिमामाई शेख, छत्रपती शाहू महाराज, विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर, महर्षी अण्णासाहेब कर्वे, कर्मवीर शिंदे, कर्मवीर भाऊराव पाटील यासारख्या समाजसुधारकांनी समाज प्रबोधनास अपार कष्ट घेतले. समर्थ रामदास स्वामींनी तर प्रेरणादायी सूत्र असे मांडले-

**"मराठा तितुका मेळवावा,**
**महाराष्ट्र धर्म वाढवावा।।"**



दि.१ मे हा महाराष्ट्र राज्याचा स्थापना दिन आहे. याच दिवशी १९६० साली तत्कालिन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांच्या हस्ते स्वतंत्र महाराष्ट्र राज्याची मुहूर्तमेढ रोवली गेली. पंडितजींनी यशवंतराव चव्हाण यांच्या हाती महाराष्ट्राचा मंगल कलश दिला आणि नव्या महाराष्ट्राच्या नेतृत्वाची जबाबदारी सोपविली. तसा महाराष्ट्राचा ऐतिहासिक, सांस्कृतिक व सामाजिक वारसा फार मोठा आहे. राष्ट्रीय सभेच्या स्थापनेपासून देशाला स्वातंत्र्य मिळेपर्यंत आणि त्यानंतरही देशाच्या प्रत्येक विधायक उपक्रमात महाराष्ट्राने हिरीरीने सहभाग घेतला आहे. प्राचीन संस्कृतीचा वारसा सांभाळतानाच देशाच्या विकासातही योगदान दिले आहे. महाराष्ट्राचा धार्मिक व सामाजिक सुधारणांचा इतिहास प्रेरणादायी आहे. राज्याचे विविधांगी भावविश्व थक्क करणारे आहे. महाराष्ट्राचे महात्म्य वर्णन करतांना राम गणेश गडकरी ऊर्फ गोविंदाग्रज यांनी लिहिले-

**"मंगल देशा, पवित्र देशा, महाराष्ट्र देशा!**
**प्रणाम घ्यावा माझा हा, श्री महाराष्ट्र देशा!!**
**राकट देशा, कणखर देशा, दगडांच्या देशा!**
**नाजुक देशा, कोमल देशा, फुलांच्याहि देशा!!**

अशा शैलीदार ओळी वापरल्या आहेत.

भारत देशाच्या स्वातंत्र्याचे स्वप्न पहात असतांनाच द्विभाषिक राज्याचे एक शक्तीशाली राज्य व्हावे, यासाठी लोकनेते, बुध्दीवादी, लेखक, पत्रकार यांनी मराठी भाषिक प्रदेश एकत्र आणण्याची कल्पना मांडली. एस.एम.जोशी, आचार्य प्र.के.अत्रे, कॉ.श्रीपाद अमृत डांगे, सेनापती बापट, प्रबोधनकार ठाकरे यांच्यासह अनेक जण नवमहाराष्ट्रासाठी एक झाले आणि संयुक्त महाराष्ट्राचे स्वप्न साकार केले. महाराष्ट्राच्या मातीचे गुणवर्णन अनेक प्रतिभावंत व इतिहासकारांनी करुन ठेवले आहे. श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांनीही वर्णय रेखाटले. त्यांनी हे महाराष्ट्र गीत लिहून महाराष्ट्राच्या व्यक्तिमत्वाचा वेध घेतला आहे-

**"बहु असोत सुंदर संपन्न की महा।**
**प्रिय अमुचा एक महाराष्ट्र देश हा।।"**

महात्मा गांधीजींनी महाराष्ट्र म्हणजे कार्यकर्त्यांचे मोहोळ, अशा शब्दांत महाराष्ट्राची प्रशंसा केली. ज्ञानपीठ पुरस्कार विजेत्या महान कवयित्री महादेवी वर्मांनी महाराष्ट्र हा भारताच्या सिंहद्वाराचा प्रहरी आहे, अशा शब्दात गौरव केला. महाराष्ट्र ही संत-महंत, ऋषि-मुनींची जशी भूमी आहे तशीच शूरवीरांचीही आहे. या भूमीला पराक्रम, त्याग आणि देशप्रेम यांची परंपरा लाभली आहे. छत्रपती शिवरायांनी सर्वधर्मसमभावाचे पालन केले. हिंदवी स्वराज्य, रयतेचे राज्य स्थापन केले. त्यांच्यापासून प्रेरणा घेऊन महाराष्ट्रातील क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके, उमाजी नाईक, गोपाळ कृष्ण गोखले, लोकमान्य टिळक, स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर, राजगुरु, नाना पाटील, बिरसा मुंडा यासारख्या अनेक देशभक्तांनी इंग्रजांविरुध्द लढा उभारला. अतोनात कष्ट, यातना सहन केल्या. त्यासाठी प्राणांचीही पर्वा केली नाही. सुंदर शब्दांत स्वाभिमान जागवताना वसंत बापटांनीही नकलून ठेवले-

**"भव्य हिमालय तुमचा अमुचा,**
**केवळ माझा सह्यकडा।**
**गौरीशंकर उभ्या जगाचा,**
**मनांत पूजिन रायगडा।।"**

महाराष्ट्राने आतापर्यंत साहित्य, कला, शिक्षण, क्रीडा, संस्कृती, नाट्य, चित्रपट, संगीत, सहकार, कृषी, उद्योग, संगणक, विज्ञान अशा विविध क्षेत्रात उत्तुंग भरारी घेतली आहे. कुणी तरी कवी बेंबीच्या देठापासून ओरडून महाराष्ट्राचा जयकारा बोलतो-

**"जय जय महाराष्ट्र माझा,**
**गर्जा महाराष्ट्र माझा!!"**

आपल्या पूर्वजांनी दिलेल्या योगदानाची जाणीव ठेवत वैभवशाली इतिहास जपत प्रगतीची नवनवी शिखरे पादाक्रांत करण्याचा निर्धार आपण करावयास हवा. हो, आपण ते करतही आहोत. परंतु माझ्या महाराष्ट्रात स्त्रियांचा अनादर, बलात्कार, जातीधर्माच्या भिंती, भ्रष्टाचार, खून, चोऱ्या, आदी कलंकित करणाऱ्या गोष्टींना अजूनही पाहिजे तशी खीळ बसलेली नाही, हे मान्य करावेच लागते. महाराष्ट्राचे गौरवगान ऐकले तर माना इंचभर उंच होतात, मात्र या गोष्टी मनात आल्याबरोबर उंच माना आपोआपच खाली लुडकतात. याची आम्हाला खरेच लाज वाटायला हवी.

# माझ्या स्वप्नातील महाराष्ट्र



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

आधुनिक केसरी

**कणखर देशा, दगडांचा देशा, पवित्र देशा....असे ज्या महाराष्ट्राचे वर्णन केले जाते त्या महाराष्ट्रात माझा जन्म झाला, त्या महाराष्ट्रात मी लहानाचा मोठा झालो, वाढलो याचा मला सार्थ अभिमान आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या कर्तृत्वाने आणि साधू संतांच्या वाणीने पावन झालेली ही पवित्र महाराष्ट्र भूमी. महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले, डॉ बाबासाहेब आंबेडकर, लोकमान्य टिळक, स्वातंत्र्यवीर सावरकर, संत गाडगेबाबा यासारखे महापुरुषही मराठी मातीनेच भारताला दिले. सात बेटांचे शहर म्हणून ओळखली जाणारी व देशाची आर्थिक राजधानी असलेली मुंबई ही याच महाराष्ट्राची राजधानी आहे.**

देशाला सर्वात जास्त महसूल हा मुंबईतूनच मिळतो, पण याच मुंबईला महाराष्ट्रापासून तोडण्याचा डाव दिल्लीश्वरांनी घातला, तेंव्हा मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती करण्यासाठी १०५ हुतात्म्यांना बलिदान द्यावे लागले. याच १०५ हुतात्म्यांमुळे संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती झाली. महाराष्ट्राची निर्मिती होऊन आज ६३ वर्ष पूर्ण झाली आहेत. या ६३ वर्षात महाराष्ट्राने सर्वच क्षेत्रात प्रगती केली आहे. कला, क्रीडा, साहित्य, शिक्षण, आरोग्य, शेती, जलसिंचन, विज्ञान, तंत्रदान, उद्योग, व्यापार अशा सर्वच क्षेत्रात महाराष्ट्राने नेत्रदीपक प्रगती केली आहे. आज महाराष्ट्र देशातील प्रगत राज्य म्हणून ओळखले जाते.

जगाला हेवा वाटावा असा निसर्ग महाराष्ट्राला लाभला आहे. एककिडे उंचच सह्याद्रीच्या रांगा तर दुसरीकडे ७२० किलोमीटरचा निसर्गरम्य समुद्रकिनारा. महाराष्ट्राला निसर्गाने भरभरून दान दिले आहे. असे असले तरी आजही महाराष्ट्रात अनेक समस्या आणि आव्हाने आहेत. महाराष्ट्रातच आज मराठी भाषेची गळचेपी होऊ लागली आहे. परप्रांतीयांच्या लोंढ्यामुळे मुंबई सारख्या शहरातून




मराठी माणूस हद्दपार होतो की काय, अशी शंका येऊ लागली आहे. अमृतातही पैज जिंकणारी असे जीचे वर्णन केले जाते, त्या मराठी भाषेची महाराष्ट्रातच उपेक्षा होऊ लागली आहे. मराठी भाषा बोलायला तरुणांना लाज वाटते. आज मराठी तरुण मराठी भाषा बोलण्याऐवजी हिंदी व इंग्रजी बोलण्याला प्राधान्य देत आहे. हिंदी व इंग्रजीच्या आक्रमणामुळे मराठी भाषा महाराष्ट्रातच मागे पडू लागली आहे. पालकही आपल्या पाल्यांना मराठी ऐवजी इंग्रजी माध्यमाच्या शाळेत दाखल करू लागले आहेत. विद्यार्थ्यांअभावी मराठी माध्यमाच्या शाळा बंद पडू लागल्या आहेत. अभिजात भाषेचे सर्व निकष पूर्ण करूनही मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिला जात नाही. सर्वसामान्य नागरिकांपासून, साहित्यिक तसेच राज्यातील अनेक नेत्यांनी ही मागणी करूनही शासन दरबारी त्याला वाटण्याच्या अक्षता लावल्या जात आहेत. आज राज्यातील ४० टक्के जनता ही तरुण आहे. पण, या तरुणांच्या हाती रोजगार नाही. राज्यात बेरोजगारीने कळस गाठला आहे. शिक्षण व गुणवत्ता असूनही हाती काम नसल्याने तरुणांना नैराश्य आले आहे. जर या तरुणांना नैराश्यातून बाहेर काढायचे असेल तर सरकारने रोजगार वाढीसंदर्भात धोरणात्मक निर्णय घ्यायला हवेत. महाराष्ट्रातील तरुणांमध्ये प्रचंड ऊर्जा आहे. मेहनत करण्याची त्यांची तयारी आहे. जर या तरुणांच्या मेहनतीचा आणि ऊर्जेचा सरकारने उपयोग करून घेतला तर महाराष्ट्र देशातील नंबर १ चे राज्य बनेल. माझ्या स्वप्नातील महाराष्ट्रातील तरुण सुशिक्षित असेल पण बेरोजगार नसेल. तरुणांप्रमाणेच शेतकरी, कष्टकरी व वंचित वर्गाचे अनेक प्रश्न आहेत. तरुणांप्रमाणे शेतकरी, कष्टकरी व वंचित वर्गाचे प्रश्न सुटले तर महाराष्ट्रात पुन्हा एकदा शेतकरी, कष्टकरी वर्गाचे राज्य येईल. माझ्या स्वप्नातील महाराष्ट्र उद्योग व्यवसायात अग्रेसर असेल. शेतीसहित अनेक लहान मोठ्या उद्योगांचा विकास झालेला असेल तो ही पर्यावरणाचा ऱ्हास न होता. माझ्या स्वप्नातील महाराष्ट्रात पी जी ते के जी शिक्षण मोफत असेल. माझ्या स्वप्नातील महाराष्ट्रात एकही मूल शिक्षणापासून वंचित राहणार नाही. माझ्या स्वप्नातील महाराष्ट्रात सर्वांना परवडेल अशा दरात आरोग्यसेवा उपलब्ध असेल. पैसे नाहीत म्हणून कुणाचाही जीव जाणार नाही. माझ्या स्वप्नातील महाराष्ट्रात भ्रष्टाचाराला थारा नसेल. शिवशाहित ज्याप्रमाणे माताभगिनी सुरक्षित होत्या, तशाच माझ्या स्वप्नातील महाराष्ट्रातही माताभगिनी सुरक्षित असेल. माझ्या स्वप्नातील महाराष्ट्रात जात-पात, धर्म -वंश याला थारा नसेल. भय, भूक आणि भ्रष्टाचार मुक्त असा माझा स्वप्नातील महाराष्ट्र असेल. माझ्या स्वप्नातील महाराष्ट्राची कीर्ती केवळ भारतातच नाही तर जगात पसरेल. संपूर्ण जगाला हेवा वाटेल असा माझा स्वप्नातील महाराष्ट्र असेल.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत)आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# पोलीस उपनिरीक्षक स्वप्नील रणखांब यांना निलंबित करून पत्रकार संरक्षण कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करा

आधुनिक केसरी न्यूज

**सागरकुमार झनके**

**नांदुरा :** ३० एप्रिल रोजी नांदुरा कृषी उत्पन्न



बाजार समितीच्या निवडणुकीसाठी मतदान सुरू असताना शहरातील प्रतिष्ठित नागरिक तथा दैनिक मातृभूमीचे पत्रकार अमर रमेश पाटील हे बातमी मिळविण्यासाठी मतदान केंद्राच्या आवारात आले असता पोलीस उपनिरीक्षक स्वप्नील रणखांब यांनी पत्रकार अमर पाटील यांच्या सोबत अरेरावीची भाषा वापरून, तू जाय रे लवकर इथून, इकडे फिरू नको असे म्हटले.यावर अमर पाटील यांनी सांगितले की साहेब मी पत्रकार आहे व निवडणुकीचा कल घेण्याकरिता मी आवारात आलो. असे सांगून सुद्धा पोलीस उपनिरीक्षक स्वप्नील रणखांब यांनी अमर



पाटील यांना म्हटले की तू लवकर निघ इथून, तू तुया घरचा, मा डोकं नको खराब करू, असे म्हटले यावर अमर पाटील यांनी रणखांब साहेबांना म्हटले की साहेब हे सर्व सभ्य भाषेत सांगता आलं असतं. यावर पोलीस उपनिरीक्षक स्वप्नील रणखांब साहेब यांनी त्यांच्या हातातील दांड्याचा धाक दाखवत म्हणाले तू कोणाशी बोलून राहिला, जास्त नको बोलू नाहीतर अंदर टाकीन बाबू, रणखांब साहेबांनी अस वक्तव्य करताना तेथे शहारातील प्रतिष्ठित नागरिक व पत्रकार उपस्थित होते. सोबतच दैनिक देशोन्नतीचे पत्रकार श्री विनोद गावंडे, दैनिक खोज मास्टरचे प्रतिनिधी शुभम ढवळे यांना सुद्धा लोटपात केली. पत्रकारासोबत अरेरावीची भाषा वापरून अरे तुरे करत अपमान केला. त्यांचे वक्तव्य बेजबाबदार व बेकायदेशीर असून एका जबाबदार पोलीस अधिकाऱ्याकडून पत्रकाराला धमकावून अरेरावीची भाषा वापरणे ही बाब अत्यंत निंदनीय आहे. याचा आम्ही सर्व पत्रकार जाहीर निषेध करतो. तसेच स्वप्नील रणखांब हे भ्रष्ट अधिकारी असून लाच घेण्याच्या त्यांचा धंदाच आहे. याचा पुरावा म्हणजे यापूर्वी १ एप्रिल २०२१ रोजी पोलीस उपनिरीक्षक स्वप्नील रणखांब यांना लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने १० हजार रुपयांची लाच घेताना पकडले होते व त्याचेवर कारवाई झाली होती. तरी असा अधिकारी हा समाजासाठी घातक असून पोलिसांची प्रतिमा समाजात मलिन करण्याचे काम अशा अधिकाऱ्यांकडून वारंवार होते. तरी पत्रकार बांधवांच्या वतीने आम्ही आपणास विनंती करतो की पोलीस उपनिरीक्षक स्वप्नील रणखांब यांची पार्श्वभूमी व आताचे गैरवर्तन लक्षात घेता त्यांच्यावर तात्काळ पत्रकार संरक्षक कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करावा व निलंबनाची कारवाई करण्यात यावी. अन्यथा नाईलाजाने पत्रकार संघाच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल याची दखल घ्यावी असे आक्रमक निवेदन महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ,जिल्हा पत्रकार संघ बुलढाणा,राष्ट्रीय विश्वगामी पत्रकार संघ नांदुरा यांच्यावतीने पोलीस अधीक्षक बुलढाणा यांना देण्यात आले.यावेळी जिल्हा पत्रकार संघ बुलडाणा जिल्हाध्यक्ष चंद्रकांत बर्दे ,साम टिव्हीचे जिल्हा प्रतिनिधी संजय जाधव,दूरदर्शन प्रतिनिधी युवराज वाघ,पत्रकार संरक्षण समिती जिल्हाध्यक्ष पुरुषोत्तम बोर्डे, नितीन पाटील कानडजे,दैनिक गावकर प्रतिनिधी प्रा.सुभाष लहाने, बिसिसयन प्रतिनिधी पवन सोनार,मराठा दर्शन संपादक नारायण पानसरे,विनोद गावंडे,यशवंत पिंगळे, किशोर इंगळे,अमर रमेश पाटील,प्रफुल्ल बिचारे,योगेश धोटे,शे. निसार शे.राशिद,राहुल खंडेराव,शुभम ढवळे,विजयकुमार वर्मा,भानुदास लकडे,देवेंद्र जयस्वाल शे आबिद शे बशीर व इतर बहुंसख्य पत्रकार उपस्थित होते.या तक्रार अर्जाची प्रतीलीप मा.गृहराज्यमंत्री महाराष्ट्र राज्य,मा. पोलीस महासंचालक मुंबई,मा.पोलीस आयुक्त अमरावती,मा. जिल्हाधिकारी बुलडाणा यांना देण्यात आली.

# वंचित समूह उघडपणे भूमिका घेत आहेत : प्रा.अंजलीताई आंबेडकर

## पुण्यात प्रबुद्ध भारत वाचक मेळावा

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** २०१४ नंतर इथे संविधानाऐवजी मनुस्मृती



पुन्हा आणा, अशी मनुवादी विचारसरणी असलेल्या राजकिय लोकांची सत्ता प्रस्थापित झाल्यानंतर देशामध्ये जे काही वातावरण बदललेले आहे. तिथे अनेक ठिकाणी वेगवेगळे वंचित समूह आताही उघडपणे भूमिका घेऊन येत आहेत की आम्हाला जर आमचं अस्तित्व टिकवायचे असेल,सुरक्षितता हवी असेल,राजकीय हक्क हवे असतील.संविधानाने दिलेली,इथल्या कल्याणकारी अर्थव्यवस्थेने दिलेली विकासाची संधी असेल या सगळ्यातून आपला समूह हा ठराविक टप्प्या पर्यंत येऊन पोहचला आहे.पण हे मिळालेले अधिकार आता हळू हळू काढुन घेण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे, असे प्रतिपादन प्रा.अंजलीताई आंबेडकर यांनी केले.

त्या पुण्यातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन येथे आयोजित करण्यात आलेल्या प्रबुद्ध भारत वाचक मेळाव्याच्या प्रसंगी बोलत होत्या.यावेळी ज्येष्ठ नेते वसंत दादा साळवे, प्रबुद्ध भारत उपसंपादक जीतरत्न पटाईत, वैभव खेडेकर यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते.प्रस्थापितांचे राजकारण आणि माध्यमे समजून घेण्याची वेळ आली आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर जेव्हा परदेशात शिकायला होते.तेव्हा त्यांनी ज्या त्या देशातील वंचित समूहाच्या बाजुने प्रस्थापित माध्यमे कुठेच नसते.ती उभी राहत नाही.वंचित समूहांना लोकांपर्यंत पोहचण्यासाठीची माध्यमे स्वतःची स्वतःला तयार करावी लागतात. हे त्यांनी अनुभवलेलं, बघितलेलं होतं.म्हणूनच त्यांनी पहिल्यांदा मुकनायक,बहिष्कृत भारत,जनता आणि जनताचे रूपांतर प्रबुद्ध भारत मध्ये केले होते.आपला विचार आपल्या लोकांपर्यंत आपल्या दृष्टीकोनातून पोहचविण्यासाठी आपली माध्यमे असली पाहिजे. हे त्यांनी ओळखलं होतं.बाबासाहेब कायमच काळाच्या पुढचा विचार करणारे होते.त्यामुळे त्यांनी आपल्याला तो मार्ग दाखवून दिला होता.वंचित समूहाच्या बातम्या माध्यमातून अदृश्य होत असतात.असे ही त्यांनी परखड शब्दात मनोगत व्यक्त केले.

प्रा.अंजलीताई आंबेडकर पुढे म्हणाल्या की, १९५६ साली बाबासाहेबांनी जनताचे रूपांतर करत असताना त्याचं नाव प्रबुद्ध भारत ठेवलं.डोळ्यासमोर दोन महत्वाचे मुद्दे होते.निवडणुकीच्या राजकारणामध्ये सत्ताधारी बनायचं असेल तर केवळ राजकिय हक्क देऊन किंवा निवडणूक लढविण्याचा हक्क देऊन उपयोग नाही तर असलेल्या राजकीय हक्कांचा वापर कसा करायचा याची जोपर्यंत मानसिक जडणघडण करत नाही.तोपर्यंत हे हक्क फक्त संविधाना पुरतेच राहील.राजकीय प्रबोधन घडवून आणण्यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी त्यावेळी प्रबुद्ध भारत हे पाक्षिक सुरू केलं, असेही त्यांनी सांगितले.प्रबुद्ध भारत वाचक मेळावा यशस्वी करण्यासाठी वंचित बहुजन आघाडी, महिला आघाडी, माथडी कामगार, युवक आघाडी, समता सैनिक दल, भारतीय बौद्ध महासभा व या संघटनांशी संबंधित असलेल्या सर्व संघटना, बुद्ध विहार तसेच पुणे शहरातील सर्व वाचक वर्ग यांनी सहकार्य केले.



# गुटखा तस्करी करणारी टोळी जेरबंद

## दोन कंटेनरसह तब्बल 1 कोटी 34 लाखांचा मुद्देमाल जप्त

आधुनिक केसरी न्यूज

**सांगली :** स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा व कवठेमहांकाळ पोलिसांना रविवारी आंतरराज्य गुटखा तस्कर करणाऱ्या टोळीला ताब्यात घेतले. तस्करी करणाऱ्या तिघांना ताब्यात घेण्यात आले आहे. या कारवाईत त्यांच्याकडून दोन कंटेनरसह १ कोटी ३४ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सांगली स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेस काही इसम कंटेनर मध्ये आंतरराज्य गुटखा तस्करी करणार असल्याची बातमी बातमीदारामार्फत मिळाली त्याअनुषंगाने सांगलीचे जिल्हा पोलिस अधीक्षक बसवराज तेली यांच्या मार्गदर्शनाखाली सांगली गुन्हे अन्वेषण शाखेने व कवठेमहांकाळ पोलीसांनी सापळा रचून दोन कंटेनर नागज फाट्यावर आले असता त्यांना ताब्यात घेतले. चौकशी केली असता समाधानकारक माहिती न देता आल्याने तपासणी केली असता कंटेनर मध्ये गुटखा, पानमसाला, व सुगंधी तबाखू असलेल्या बेगा आढळून आल्या. कारवाईत तिघांना ताब्यात घेण्यात आले असून १ ) तिपुराया संगाप्पा चमनोळी वय २६ वर्षे रा. करजगी ता. जत, जि.सांगली २. बसवेश्वर टोपण्णा कटीमनी वय २६ वर्षे रा. करजगी ता. जत जि. सांगली. ३ ) श्रीशैल तमाराया हळके वय ३० वर्षे रा. लहान उमदी सुसलाद रोड ता. जत जि.सांगली अशी त्यांची नावे आहेत. त्यांच्याकडून जप्त मुद्देमाल

पुष्पा गुटखा, विमल पान मसाला, व्हि-१ टोबॅको व बिमल तंबाखु ची पॅकेट असलेली ३०९ पोती २. दोन टाटा ट्रक कंटेनर क्र. एमएच ०४ ईबी ०४८९, एमएच १२ आरएन ३२०३ असा एकूण १,३४,०९,७००/- रु चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. मा. अपर पोलीस अधीक्षक तुषार पाटील, मा. एसडीपीओ तासगांव अश्विनी शेंडगे मॅडम यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलीस निरीक्षक सतिश शिंदे, पोलीस निरीक्षक जितेंद्र शहाणे, सपोनि प्रशांत निशाणदार, जितेंद्र जाधव, दीपक गायकवाड, राजु शिरोळकर, राजाराम मुळे, सचीन धोत्रे, संजय पाटील, नागेश खरात, राहुल जाधव, संदिप नलवडे, ऋतुराज होळकर, विनायक सुतार, कवठेमहांकाळ पोलीस ठाण्याकडील देसाई, बाघमोडे अन्न व औषध प्रशासन सांगलीचे अन्न सुरक्षा अधिकारी दत्तात्रय कोळी यांच्याकडून कारवाई करण्यात आले.

महाराष्ट्र Business Katta
















# आयु:पंख

या आयुर्वेदिक स्त्री वैद्य संघटना मार्फत नेहमीच महिलांसाठी विविध कार्यक्रम घेण्यात येतात. सदर संघटनाचे फाऊंडर डॉ. सौ. मंगल सुरेश ताठे आणि विविध पदाधिकारी डॉ. वृषाली निर्वे, डॉ. सुनीता परिहार, डॉ. सुनीता राठोड, डॉ. सुचिता सावळे यांच्या उपस्थित दि.29 एप्रिल रोजी सकाळी 11 ते 1 या वेळेत कॅन्सर प्रबोधनपर व्याख्यान घेण्यात आले. ग्रामीण भागात कॅन्सर या आजाराविषयी जनजागृती व्हावी. तसेच योग्य वेळी तपासणी व निदान होऊन कॅन्सर सारखा आजार लवकरात लवकर बरा व्हावा, किंवा या आजाराची शरीरातील पूर्वलक्षणे काय आहेत, यात नियमित तपासणी काय असतात. तसेच या आजाराच्या रुग्णांची मानसिकता , घरातील इतर सर्वांचे वागणे कसे असावे, सर्वांनी काय काळजी घ्यावी, रुग्णांस खंबीर कसं बनवावं. या उद्देश्याने आपण समुपदेशक गीता उदय पोळ यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले. त्या स्वतः ट्युलीप मैत्र संस्थाचे अध्यक्षा आणि समुपदेशक आहेत. त्या वेगवेगळ्या ठिकाणी जनजागृती करत असतात. सेवाभावी वृत्तीने आणि समाजाचे देणे या अनुषंगाने आयु:पंख आणि ग्रामपंचायत पिसादेवी यांच्यातर्फे हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमास पिसादेवी ग्रामपंचायत सदस्या सौ. नर्मदा काळे, सौ. निर्मला काळे अंगणवाडी सेविका सौ. निर्मला मते यांच्यासह अन्य प्रतिष्ठित महिला उपस्थित होत्या.

या वेळी अनेक महिलांनी आपले स्वानुभव सांगितले आणि जनतेला आवाहन केले की कॅन्सरशी लढा देण्यासाठी समाजाने विशेषतः ग्रामीण भागातील समाज व्यवस्थेने मोकळेपणाने बोलणे गरजेचे आहे. अश्या प्रकारच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यासाठी आपण खालील नंबरवर संपर्क करू शकता.

**सौ.गीता उदय पोळ, संपर्क 9689040456**

# प्रसन्न मन ... गर्भसंस्काराचे पहिले पाऊल

आयुर्वेदिक गर्भसंस्काराचे पहिले पाऊल अर्थात पहिला टप्पा म्हणजे मन. संत तुकारामांनी म्हटलेच आहे,

मन करा रे प्रसन्न सर्व सिद्धीचे कारण

आयुष्यात कुठल्याही प्रकारची सिद्धी हवी असेल, यश हवं असेल तर तुमचे मन प्रसन्न असणे अत्यंत महत्त्वाचे असते. मग निसर्गाकडून स्त्रीला प्राप्त झालेले वरदान म्हणजे मातृत्व ते सिद्धी जाण्यासाठी तुमचे मन प्रसन्न असणे म्हणजे आयुर्वेदिक गर्भसंस्काराचा पाया..




म्हणूनच आयुर्वेदात श्रेष्ठ गोष्टींमध्ये, गर्भ राहण्यासाठी श्रेष्ठ गोष्टींमध्ये प्रसन्न मन अग्रस्थानी आहे.

आयुर्वेदीय गर्भसंस्काराचा विचार करताना, आयुर्वेद शास्त्रामध्ये निरोगी जीवनाची परिभाषा लिहिताना, किंवा स्वास्थ्य म्हणजे काय.. याचे वर्णन करताना एक उत्तम संज्ञा वर्णन केली आहे.. समदोषः समग्निश्च समधातू मलक्रियः । प्रसन्न -आत्मा-इंद्रिय-मनः स्वस्थ इति अभिधियते ॥....सु. सू.15/10

निरोगी जीवनाचे वर्णन करताना, तुमचे केवळ शरीर निरोगी असून चालत नाही, त्याचबरोबर मनालाही तेवढेच महत्त्व प्राप्त झालेले आहे. आधुनिक परिभाषेत सांगायचे झाले तर तुमचे सर्व ब्लड रिपोर्ट, आणि इतर सर्व काही तपासण्या नॉर्मल आहे आणि मन जर प्रसन्न नसेल, मन निरोगी नसेल तर त्याचा शरीरावर वाईट दुष्परिणाम होताना दिसून येतो, मनात घडणाऱ्या गोष्टी कुठलाही तपासण्यांमध्ये येत नाहीत. त्यात स्वतःलाच अनुभवून परीक्षण करून बदलाव्या लागतात. या सर्व गोष्टींना आयुर्वेद शास्त्रामध्ये अत्यंत महत्त्व आहे. WHO ( World Health Organisation ) नुसार स्वास्थ्याची परिभाषा खालील प्रमाणे आहे, " Health is a state of complete physical, mental and social well-being and not merely the absence of disease or infirmity. आयुर्वेदामध्ये स्वास्थ्याची परिभाषा ही यापेक्षाही सखोल मांडली गेलेली आहे.

शरीराला कुठलेही आजार नसणे म्हणजे निरोगी असणे असा अर्थ निरोगी जीवनाचा कधीच होत नाही. परंतु तुमचे मन जर प्रसन्न असेल तर शरीराचा अतिशय दुर्धर व्याधी देखील बरा होऊ शकतो, आणि येथूनच सुरू होते चक्र आयुर्वेदिक गर्भसंस्काराचे. आयुर्वेदिक गर्भसंस्कार हे त्या स्त्रीला जीवन जगण्याची दिशा दाखवतात. स्त्रीचा स्वतःचा सर्वांगीण विकास घडवून आणतात. तिला निरोगी जीवनशैलीचे महत्त्व पटवून देतात. त्यामुळे तुमच्या जवळच्या आयुर्वेदिक डॉक्टरांकडे आयुर्वेदिक गर्भसंस्काराचा हट्ट धरणे, आग्रह धरणे गरजेचे आहे. गर्भसंस्कार म्हणजे केवळ व्यायाम प्राणायाम इथपर्यंतच मर्यादित नाही आहे. याची व्यापक अशी परिभाषा ही वृत्तीतूनच. आयुर्वेदीय गर्भसंस्कार हे फक्त गर्भसंस्काराच्या काळातच उपयुक्त ठरत नाहीत तर पुढेही त्या स्त्रीच्या सर्वांगीण विकासासाठी आयुष्यभर तिला उपयोगी पडतात.

स्त्रीचे मन प्रसन्न असेल तर गर्भधारणा राहण्यासाठी ज्या काही अडचणी येतात त्यावर ती सहजरित्या मात करू शकते, आणि नैसर्गिकरित्या गर्भधारणा राहण्यासाठी सुकर जाते. मी आई होऊ शकते हा तिच्या मनातील निर्धार तिच्यातील आजार दूर करू शकतो. सकारात्मकता वाढल्यामुळे शरीरातील पॉझिटिव्ह पेशीची संख्या वाढते. आणि आश्चर्यकारक असे रिझल्ट आपल्याला पाहायला मिळतात. म्हणूनच प्रॅक्टिस करताना असे बरेच अनुभव येतात ज्यामध्ये औषधींपेक्षाही सकारात्मकतेचा शरीरावर जास्त परिणाम होताना दिसून येतो, आजार लवकर बरा होऊन मातृत्वप्राप्ती लवकर होते.



**डॉ. मंगल सुरेश ताठे**
**[ एम. डी.आयुर्वेद ] मो.9168101060**
**संचालक- शारदा क्लिनिक संचलित शाश्वत आयुर्वेद व गर्भसंस्कार चिकित्सालय, पिसादेवी, छत्रपती संभाजीनगर**
**फाउंडर - स्त्री वैद्या संचलित आयु पंख संघटना**

# वयाच्या 50शी नंतरही दिसा तरुण



तंदुरुस्त आणि निरोगी जीवनशैली स्वीकारणे म्हणजे केवळ आपल्या जीवनात अधिक बदल करणे किंवा नवीन सवयी लावणे असा अर्थ मुळीच नाही, तर याचा खरा अर्थ आपल्या नियमित दिनचर्येकडे लक्ष देणे होय. आयुर्वेदानुसार रोजच्या चांगल्या सवयींचे पालन करून निरोगी जीवन जगता येते. आयुर्वेदिक तज्ज्ञ डॉ नितिका कोहली म्हणाल्या, “आयुर्वेद ही एक जीवनशैली आहे, आपल्या सवयी सुधारण्याचा हा रोजच्या जीवनातील एक यशस्वी प्रयत्न आहे. या प्राचीन ज्ञानाच्या मार्गदर्शनामुळे आपण आहार आणि जीवनशैली सुधारू शकतो जेणेकरून केवळ निरोगी आयुष्यच जगता येणार नाही दीर्घ आयुष्य देखील जगता येईल. त्या म्हणाल्या, 'आयुर्वेद तुम्हाला शरीर, मन आणि आत्मा यांच्यात संतुलन शोधण्यासाठी प्रोत्साहित करतो. कारण ही तीन क्षेत्रे एकमेकांना जोडलेली आहेत.' त्यांनी आयुर्वेदाशी संबंधित काही महत्त्वाच्या सवयी इन्स्टाग्रामवर पोस्टद्वारे शेअर केल्या, ज्या प्रत्येकजण निरोगी जीवन जगण्यासाठी स्वीकारू शकतो. आयुर्वेदानुसार सकाळी सूर्योदयाच्या किमान एक तास आधी लवकर उठले पाहिजे. ही एक चांगली सवय आहे आणि निरोगी जीवन जगण्यास मदत करते. आपले वाडवडील नेहमीच ब्रह्म मुहूर्तावर उठण्याचा मोलाचा सल्ला देतात. ब्रह्म मुहूर्त हा एक शुभ काळ आहे, जो सूर्योदयाच्या 1 तास 36 मिनिटे आधी सुरू होतो आणि त्याच्या 48 मिनिटे आधी संपतो. तिळाचे तेल, मोहरीचे तेल किंवा तुपाचे यापैकी कोणतेही दोन थेंब नाकात घाला. हे केस अकाली पांढरे होण्यास प्रतिबंध करते, टक्कल पडण्यापासून बचाव करते आणि चांगली व शांत झोप लागण्यास सुद्धा भरपूर मदत करते.

श्री संत
जगदीश हॉस्पिटल
आयुर्वेद चिकित्सा व पंचकर्म केंद्र
डॉ.अभिजीत भा.सावळे
एम डी (आयुर्वेद)
७५८८८१८५०५
डॉ सुचिता अ.सावळे
बी ए एम एस
डी.वय. एन (पुणे)
८४८५८०३४९०
साई हेरिटेज,पहिला मजला,रिद्धी सिद्धी हॉल जवळ,खिवांसरा पार्क,औरंगाबाद

# आयुर्वेद व मातृत्वाची चाहूल... एक सुखद अनुभव

-आपण मागच्याच लेखामध्ये पाहिलं वंधत्वा, वंधत्वाचे कारणे, आणि त्यावर आयुर्वेदिक ट्रीटमेंट आपण काय करू शकतो.

मातृत्व लाभत नाही असं सांगीतलेल्या पेशंटला सुद्धा आयुर्वेदिक ट्रीटमेंट घेऊन मातृत्व लाभलं आहे.

मातृत्व......

"तो" क्षण कोणतीही स्त्री उभ्या आयुष्यात विसरू शकणार नाही. कळल्या कळल्या हृदयाचा ठोका एक क्षणासाठी तरी नक्कीच चुकतो शरीरातील ते गोड गुपित जेव्हा उभक्त तेव्हा आनंद अगदी गगनात मावेनासा होतो. गोड बातमी घरच्यांना जवळच्या आपल्या लोकांना सांगताना अपार आनंदा बरोबर काहीच संकोचही वाटत असतो. बरोबरीनेच मनात एक ना अनेक शंका यायला सुरुवात होते, की सगळे व्यवस्थित तर होईल ना माझं बाळ चांगले असेल ना? त्या पाठोपाठ उत्सुकता ही निर्माण होते, एक असेल की जुळे?

स्त्रिया मध्ये पहिली पाळी चुकल्यानंतरच दिवस राहिल्याचे लक्षात येते. तेव्हापर्यंत गर्भधारणा होऊन जवळजवळ 14 ते 15 दिवस झालेले असतात. आजच्या काळात लघवीची घरच्या घरी एक छोटी तपासणी करून, प्रायमरी लेवलला गर्भधारणा झाल्याची खात्री करू शकतो. मात्र, गर्भधारणा झाल्याची खात्री एक वेळा तज्ञांकडून अवश्य करून घ्यावी.



दिवस राहिल्या नंतर बहुतांशी स्त्रियांमध्ये दिसणारी लक्षणे

*तोंडाला पाणी सुटणे, उलट्या होणे.
*चक्कर येणे.
*कशातही मन न लागणे तरीही आत कुठेतरी समाधान, तृप्तीची भावना प्रतीत होणे.
*अंग गळून गेल्यासारखे वाटणे.
*छातीत धडधडणे.
*छातीस जळजळने.
*कोणताही उग्रवास सहन न होणे.

प्रत्येक स्त्रीमध्ये ही सगळी लक्षणे दिसतीलच असे नाही. बहुतेक वेळा पहिल्यांदाच दिवस गेलेले असल्यास ही लक्षणे जास्त प्रमाणात आढळतात. दुसऱ्या किंवा तिसऱ्या वेळी हा त्रास कमी कमी होत जातो. काही बायकांमध्ये तर काहीही त्रास होत नाही. इथे एक गोष्ट आवर्जुन सांगवीशी वाटते की प्रत्येक स्त्रीची प्रत्येक गरोदरपणा वेगळा असते. तिला होत असणारा त्रास किंवा येणारा अनुभव हा तिच्या व तिच्या बाळाच्या प्रकृतीवर अवलंबून असतो. एकदा का स्वस्थ बाळ हातात आले की गरोदरपणात झालेल्या सर्व त्रासाची जाणीव क्षणात नाहीशी होते. बहुतेक वेळा असं पाहण्यात येते की नुकतेच दिवस राहिलेल्या स्त्रीला बघून सर्व प्रौढ स्त्रियांची अशी प्रतिक्रिया असते की, हिला कसा इतका त्रास होतो आहे आम्हाला एवढी बाळंतपणे होऊनही असं काही नव्हतं झालं.

पण काळ ,परिस्थिती, वर सांगितल्याप्रमाणे स्त्रीची प्रकृती आणि शक्ती या सर्व गोष्टीच्या अनुषंगाने प्रत्येक स्त्रीचा अनुभव वेगळा असू शकतो त्याची कोणती अपेक्षा तुलना करू नये.

गर्भ गर्भाशयात राहण्याचा कालावधी 280 दिवस किंवा 40 आठवडे असतो. पाळी चुकल्याच्या तारखेवरून प्रसूतीची अंदाजे तारीख काढता येते. सामान्यताः या तारखेच्या आठ दिवस अलीकडे पलीकडे प्रसूती होण्याची शक्यता असते.

गर्भावस्थेचा काळ बाळाच्या आणि स्त्रीच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचा आणि संवेदनशील असतो. स्त्रीच्या शरीरात एक नवीन जीव आकार घेत असल्याने तिला खाण्यापिण्यात, आचरणात, विचारात खूप काळजी घ्यावी लागते. गर्भिणीची नाजूक अवस्था चरकाचार्य या शब्दात वर्णन करतात....

पूर्णमिव तेल पात्र असंक्षोभायता न्तवेक्षी भवत्युप चर्य :। ... चरक शारीर स्थान.

काटोकाठ भरलेलं तेलाचे भांडे जसे इकडून तिकडे नेताना अतिशय काळजीपूर्वक, हात जराही हलू न देता न्यावे लागते तसेच गर्भवती स्त्रीला जीव ओतून, जीवापेक्षाही प्रिय असलेले आपला आत आकार घेणाऱ्या जीवाची व स्वतःची काळजी घ्यावी लागते. त्याचबरोबर घरच्या व जवळच्या लोकांनाही त्याची जबाबदारी व सहभाग विसरून चालत नाही. या दिवसांमध्ये स्त्रीला शारीरिक व मानसिक स्तरावर जपणे व सर्व बाजूने दक्षता घेणे आवश्यक असते.




- डॉ. सुचिता अ. सावळे
बी.ए.एम.एस.,डी.वाय. एन.,एम.ए.( योगा )
Infertility, prenatal yoga and Garbhsanskar Consultant

# अजीम नवाज राही: मनावर अधिराज्य गाजवणारा साहित्यिक व सूत्रसंचालक

आधुनिक केसरी

**खरंतर दादासाहेब सोमण यांना स्वातंत्र्य सेनानी म्हणून ओळखल्या जाते.आपली भारतमाता पारतंत्र्यातून मुक्त व्हावी यासाठी तुरुंगवास भोगणारे, इंग्रजांना सळो की पळो करण्यासाठी बॉम्ब बनविण्याचे आरोपाखाली अटक झालेली असतांना आणि विशेष म्हणजे अहिंसेचे पूजक असणाऱ्या महात्मा गांधींचा ज्यांच्यावर प्रभाव होता,जे असहकार आणि चले जावं आंदोलनात सक्रिय होते,ज्यांना विनोबा भावे यांचा देखील सहवास लाभला,ज्यांनी १९३० च्या सविनय कायदेभंग चळवळीत सहभाग नोंदवला,जे मेहकर तालुका काँग्रेसचे अध्यक्ष होते आणि नंतर ज्यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या विचारांवर नंतरची वाटचाल केली असे दादासाहेब सोमण यांचे कार्य स्वातंत्र्य लढ्यात महत्वाचे जरी असले,ते नाकारता येत नसतांना देखील " गोडवा " च्या निमित्ताने त्यांचे कार्य अभ्यासतांना मला दादासाहेब भावले ते त्यांच्या शैक्षणिक आणि औद्योगिकधोरणामुळे.**




सिद्धेश्वर राना पवार
संपर्क क्र.: 9422880080

***कभी समस्या तो कभी समाधान है ज़िन्दगी,***
***कभी सम्मान तो कभी बलिदान है ज़िन्दगी,***
***क्यो की कभी उच्च शिखर तो कभी गहरी,***
***ढलान है ज़िन्दगी।***

अजीम नवाज राही...अफाट व्यक्तिमत्व असणारा माणूस. स्वतः इयत्ता दहावी नापास असतांना देखील ज्यांच्या अनेक विद्यापीठांमध्ये कविता अभ्यासक्रमाला आहेत,ज्यांच्या शिवाय कुठलाही समारंभ संपन्न होत नाही.जो आपल्या प्रभावी सूत्रसंचालनाने कार्यक्रमात 'जान' आणतो,अशा व्यक्तिमत्त्वाचा धनी असणारे अजीम नवाज राही म्हणजे लोकांच्या मनावर अधिराज्य गाजविणारा साहित्यिक आणि सूत्रसंचालक. मला आठवतं, माझे वडील स्व रा.ना.पवार यांनी कुठले तरी नाटक दिगदर्शीत केले होते.त्या नाटकात माझ्या वडिलांचे अतिशय जवळचे मित्र नाट्यमहर्षी स्व.आबासाहेब जोशी, नाट्यभूषण स्व नाना बोरकर आणि नटवर्य भगवानराव गायकवाड याची देखील भूमिका होती. १९८२-८३ चा तो काळ असावा. स्व आबासाहेब जोशी हे एका साधूच्या भूमिकेत होते,एव्हढेच काय ते मला आठवते.कारण त्यावेळी फारसे काही कळण्यासारखे माझे देखील वय नव्हते.

तो काळ म्हणजे नाट्यचळवळीचा बहरलेला काळ. सुल्तानपूर येथे नाटक म्हटले की खेड्यापाड्यातील जनता,बैल गाडी,सायकल आणि पायी पायी नाटक बघण्यासाठी यायची. नाटकांची रंगीत तालीम महिनो महिने चालायची. त्यावेळी गणपती उत्सव म्हटला की, त्या दहा दिवसांत हमखास नाटक असायचेच.सुल्तानपूर येथील आमचे घर देखील मोठे. मोठी माडी आणि त्या माडीवर बाबा नाटकाची रंगीत तालीम घ्यायचे.

बाबांचा स्वभाव अष्टपैलू.वक्तृत्व,नाट्य दीगदर्शन, लेखन ह्या सगळ्यांमध्ये बाबांचा लीलया वावर असायचा. यामुळे नाट्यभूषण स्व नाना बोरकर त्यांच्या राजदूत गाडीवर बाबांना भेटायला, त्यांच्यासमवेत चर्चा करायला हमखास यायचे. त्याचवेळी अनेकदा एक हडकुळा तरुण त्यांच्या समवेत असायचा. हा तरुण म्हणजे भविष्यातील मोठा साहित्यिक, नामवंत निवेदक असेल आणि आपली या माणसासोबत रक्ताच्या नात्या पलीकडची मैत्री जुळेल असे स्वप्नात देखील वाटले नाही.

आज अजीम नवाज राही यांचे आभाळाएव्हडे जे व्यक्तिमत्व निर्माण झाले आहे त्याच्या मुळाशीच नाट्य चळवळ आहे. इयत्ता दहावी अनुत्तीर्ण झाल्यानंतर अजीम नवाज राही यांनी साखरखेर्डा येथील बस स्थानकावर पान ठेला टाकला. नाट्यभूषण स्व. नाना बोरकर यांना सिगारेट ची सवय. सिगारेट च्या निमित्ताने नाना बोरकरांचे राहीच्या पान ठेल्यावर नेहमी जाणे येणे.

ज्याकाळात एकच विडी, विझवून २,३ वेळा पिल्या ( ओढल्या ) जायची,त्या काळात ब्रिस्टॉल चे अख्खे पाकीट संपविणारे नाना बोरकर अजीम नवाज राही यांचे आवडते ग्राहक. ग्राहक आणि विक्रेता या नात्यातून स्व नाना बोरकर व अजीम नवाज राही यांचे सूर जुळले आणि मग दिवसा पान टपरी, आणि रात्री नाना बोरकर यांच्या समवेत नाटकांची रंगीत तालीम,त्यातून प्रोम्पटिंग करण्याची जबाबदारी राहीवर देण्यात आली.

नाटकातील कलावंतांना त्यांचे संवाद पडद्यामागून हळू आवाजात सांगणे यामुळे मराठी भाषेतील अशुद्धपणा नाहीसा झाला.अमराठी असलेल्या अजीम नवाज राही यांच्या असख्लीत मराठी भाषा बोलण्याचे हे गमक ठरले.त्यातून मराठीची आवड निर्माण झाली आणि मराठीतील अशुद्धपणा नाहीसा झाला. नाटक सुरू होण्यापूर्वी बोलण्याची जबाबदारी अजीम नवाज राही पार पाडू लागले. त्यावेळी नाटकाच्या उद्घाटनाला नेते मंडळीला बोलावल्या



जायचे. नाट्यभूषण स्व नाना बोरकर हे शेंदुर्जन येथील रहिवासी.सहकार महर्षी स्व भास्करराव जी शिंगणे यांचे मूळ गाव शेंदुर्जन.स्व भास्करराव शिंगणे त्यावेळी शेतकरी कामगार पक्षाचे आमदार. प्रामुख्याने ह्या उद्घाटन सोहळ्याला भास्करराव शिंगणें असायचे. त्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अजीम नवाज राही करायचे.नाट्य चळवळी मुळे मराठीशी ओळख झाली,माईक हातात आला,सूत्रसंचालन दिमतीला आले आणि त्यातून महाराष्ट्राला एक नामवंत सूत्रसंचालक मिळाला आणि व्यवहाराचा काळा घोडा,कल्लोळातला एकांत,वर्तमानाचा वतनदार

तळमळीचा तळ ह्या चार कविता संग्रहाचा नामवंत कवी मिळाला. अजीम नवाज राही यांचा जीवनप्रवासच अचंबित करून सोडणारा. शिक्षण पहिली ते सातवी पर्यंत उर्दू माध्यमातून आणि त्यानंतर गावात उर्दू शाळा नाही म्हणून इयत्ता ८ वी ते १० वी ( अनुत्तीर्ण ) मराठी माध्यम. दहावी अनुत्तीर्ण झाल्यानंतर ज्या शाळेत त्यांनी शिक्षण घेतले त्याच शाळेसमोर आईस कांडी विकण्याचे काम केले आणि त्यानंतर पान टपरी टाकून पोटाची खळगी भरली. पदोपदी जो संघर्ष वाट्याला आला त्यातून कविता जन्माला आली आणि मायमराठी च्या पदरात एक ख्यातनाम साहित्यिक पडला.

सूत्रसंचालनाला या माणसाने प्रतिष्ठा प्राप्त करून दिली.माय मराठी भाषेवर देखील जगता येते,सुत्रसंचलनासाठी देखील समाज भरभरून पैसे देऊ शकतो हे दाखवून देण्याचे काम राहिनीं केले.

अख्खे जग ठप्प करवून सोडणाऱ्या कोरोनाने राहिना गाठले होते.तब्बल दिड महिना हा माणूस कोमात होता. मित्रत्व जोपासणारा,सुखदुःखात धावून येणारा हा मित्र जगला पाहिजे,अशी माणसं समाजाची गरज आहे.अशाच माणसांमुळे राष्ट्रीय एकात्मतेची भावना टिकून आहे,अशा माणसाला पुन्हा आपल्यात आणणे समाजासाठी,मैत्रीच्या गोतावळ्याकरिता महत्वाचे आहे.ह्या भावनेतून स्व समाधानभाऊ सावळे पाटील,मी आणि दैनिक देशोन्नती चे जिल्हा प्रतिनिधी राजेंद्र काळे अशा आम्ही मित्रांनी प्रयत्नाची पराकाष्ठा केली.भाऊ पाटील ग्रुप मदतीला आला.केवळ स्टेट्स ठेवून लोकांना मदतीचे आवाहन करण्यात आले आणि लोकांनी देखील आवाहनाला प्रतिसाद देत भरभरून मदत केली. तत्कालीन मंत्री आ डॉ राजेंद्र शिंगणे, ऍड नाझेर काझी सरसावले आणि महिनाभर कोमात राहूनही मैत्रीच्या ताकदीमुळे आमचा हा सखा आमच्यात परत आला खरा...मात्र अनेकांना मृत्यूच्या दाढेतून परत आणणाऱ्या 'भाऊ पाटील' नावाच्या शक्तीस्थळाला आम्ही परत आणू शकलो नाही याचे दुःख आयुष्यभर असेल.

अजीम नवाज राही यांचा १ मे रोजी वाढदिवस संपन्न झाला.आणि वाढदिवसाच्या दिवशीच त्यांच्या तळमळीचा तळ या कविता संग्रहाला मातोश्री लक्ष्मीबाई मगरे प्रतिष्ठाण दर्यापूर चा कवी देवानंद गोरडे काव्यपुरस्कार २०२२ जाहीर झाला.

ख्यातनाम कवी असलेल्या ह्या साहित्यिकाला वाढदिवसाची अशी अनोखी भेट यापेक्षा दुसरी कोणती असू शकणार..? अजीम नवाज राही यांना १ मे ह्या वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा.

***जख्म सहेने का तडपने का करीना आया***
***कत्ल सौ बार हुये तब जा के जिना आया***

# या महिन्यात सूर्य आग ओकणार



सुरेश मंत्री
संपर्क क्र. ९४०३६५०७२२

आधुनिक केसरी

**ब्लूमबर्गच्या २०२२ च्या अहवालानुसार आशियातील देशांना यावर्षी विक्रमी उष्णतेच्या लाटांचा सामना करावा लागणार आहे. जागतिक पातळीवरील गव्हाच्या पुरवठ्यावर उष्णतेच्या लाटांचा परिणाम झाला आहे. थायलंड आणि बांगला देशातील तापमानातही सातत्याने वाढ होत आहे. चीनच्या युनान प्रांतात तर उष्णतेमुळे दुष्काळ पडला आहे. देशातील विविध भागांत सध्या अवकाळी पाऊस पडत आहे. त्यामुळे गेल्या काही दिवसांपासून तापमानात घट नोंदवली जात आहे.**

दरम्यान, मे महिन्यात देशातील अनेक भागात तीव्र उष्णतेची शक्यता आहे. राज्यात मे महिन्यात कमाल तापमान अधिक राहणार असल्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. मध्य महाराष्ट्रात काही प्रमाणात उन्हाची झळ कमी बसणार असल्याचे हवामान विभागाने म्हटले आहे. हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, मे महिन्यात कोकणात सरासरीपेक्षा कमाल तापमान अधिक राहणार आहे. विदर्भातील काही ठिकाणी देखील कमाल तापमान सरासरीपेक्षा अधिक राहण्याचा अंदाज आहे. विदर्भात एक-दोन जिल्ह्यात उष्णतेच्या लाटेचा अंदाज असून महिन्यातील दोन दिवस सर्वाधिक उष्ण राहण्याचा अंदाज आहे. उष्णतेच्या लहरींमुळे वातानुकूलित यंत्रे आणि पंखे यांचा वापर वाढतो. यासारख्या उपकरणांमुळे विजेचा वापर वाढतो. विजेचा अतिवापर होण्याची शक्यता आहे. त्यामुळे पॉवर ग्रीडवर जास्त दाब येतो आणि ब्लॅक आऊटचा धोका वाढतो. त्यामुळे विद्युत सेवा प्रभावित होऊन उद्योगधंद्यांना याचा फटका बसण्याची शक्यता आहे. असे झाल्यास परिणामी अर्थव्यवस्थेला हानी पोहोचू शकते. विजेचा मुबलक पुरवठा न झाल्यास अनेकांनी ब्लॅक आऊटसारख्या समस्यांना सामोरे जावे



लागू शकते. जास्त उष्णता लोकांसाठी घातकही ठरू शकते. हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार पूर्व भारतातील काही भागात उष्ण हवामान दिसून येणार आहे. देशाच्या पूर्व आणि मध्य भागात कमाल तापमान सामान्यापेक्षा जास्त राहण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे.काय काळजी घ्याल ? तापमानात अचानक झालेल्या या वाढीमुळे त्याचे गंभीर परिणाम मानवी शरिरावर होऊ शकतात. सर्वसामान्य निरोगी व्यक्तीला अचानक झालेली ही तापमानवाढ सहन करता येऊ शकते. पण नवजात बालकं, वयोवृद्ध व्यक्ती किंवा जुने गंभीर आजार असलेल्या लोकांवर याचा वाईट परिणाम होतो. या परिस्थितीत उष्णतेच्या लहरीबद्दल समाजामध्ये जनजागृतीची गरज आहे. स्थानिक पातळीवर काम करणाऱ्या संस्था, रेडक्रॉससारखी संस्था, सरकार, स्थानिक प्रशासन या माध्यमातून लोकांपर्यंत ही माहिती पोहोचायला हवी. अशा वातावरणात आपण काही गोष्टींची काळजी घेणं आवश्यक आहे. उष्णतेची लाट आल्यानंतर आपण थेट ऊन्हाच्या संपर्कात येणं टाळलं पाहिजे. शरीराचं तापमान शक्य तितकं थंड ठेवण्याचा प्रयत्न करावा. शरीरातील पाण्याचं प्रमाण संतुलित ठेवावं. तहान लागली नाही तरी मुबलक प्रमाणात पाणी प्यावं. ORS, लिंबू सरबत, तांदळाची पेज, ताक आदी पेय पिता येऊ शकतात. चहा-कॉफी, मद्यपान, सॉफ्ट ड्रिंक यांच्यामुळे शरिरातील पाण्याचं प्रमाण कमी होतं. त्यामुळे ते टाळायला हवेत. हलक्या रंगाचे, सुती कपडे परिधान करावेत. बाहेर पडल्यानंतर शक्यतो डोकं टोपी, रुमाल यांनी झाकावं. किमान दोनवेळा थंड पाण्याने आंघोळ करावी.

# जलसंवर्धनात महाराष्ट्राचे यश !

आधुनिक केसरी

केंद्रीय जलशक्ती मंत्रालयाने संपूर्ण देशभरात महाराष्ट्र राज्य जलसंवर्धनामध्ये प्रथम क्रमांकावर असल्याचे नुकतेच जाहीर केले आहे.खरोखर ही महाराष्ट्राच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची आंनंदाची बाब म्हणावी लागेल. जलसंवर्धानात महाराष्ट्राचे यश म्हणावे लागेल. महाराष्ट्र सरकारने जलयुक्त शिवार अभिनयाच्या माध्यमातून राज्यात जलक्रांती आणण्याचे दृष्टीने प्रयत्न केले होते. जलयुक्त शिवार अभियान ही शासनाची अतिशय महत्वाकांक्षी योजना होती. राज्य शासनाने सुरू केलेल्या जलयुक्त शिवार अभियानाद्वारे शेतीसाठी तसेच पिण्याच्या शाश्वत पाणी उपलब्ध होण्यासाठी हे अभियान प्रभावीपणे राबविण्यात आले होते. केंद्रीय जलशक्ती मंत्रालयाने प्रथमच यावर्षी भारतातील जलाशयांची गणना करून एक अहवाल नुकताच प्रकाशित करण्यात आला. यामध्ये सर्वाधिक प्रमाणात व यशस्वी जलसंवर्धन राबवणार्या महाराष्ट्राला प्रथम क्रमांक मिळाला आहे. वर्ष २०१८-२०१९मध्ये हि गणना करण्यात आली होती. राज्याच्या एकूण शेतीच्या उत्पन्नात ६०टक्के वाढ,१८००गवांना पाणी,५२७०धरणे गाळमुक्त ,१,६१०००शेततळे,१,७३०००सिंचन विहिरी तसेच भुगर्भ पातळीत ३मी. वाढ झाली. जलयुक्त शिवार,गाळमुक्त धरण,गाळमुक्त शिवार,मागेल त्याला शेततळे आदी योजना एकत्रितपणे शासनाने राबविल्यामुळे हे यश मिळाले आहे.केंद्रशासित प्रदेशांच्या क्षेत्रातील २०लाखाहुन अधिक जलाशयाची मोजणी करण्यात आली.त्यानुसार जलसंवर्धनामध्ये महाराष्ट्र देशात आघाडीवर राहीला. खरोखर जलसंवर्धनामध्ये महाराष्ट्र सरकारचे कौतुकास्पद यश म्हणावे लागेल. **- संतोष दत्तू शिंदे, अहमदनगर**

# विधायक मार्गदर्शन करणारी : ' जीवनदृष्टी '



उमेश मोहिते
संपर्क ७६६६१८६९२८

आधुनिक केसरी

**कर्नाटकातील बेळगाव जिल्ह्यातल्या निपाणीचे सेवानिवृत्त प्राचार्य डॉ.अच्युत माने लिखित ' जीवनदृष्टी ' हा लेखसंग्रह नुकताच कोल्हापूर येथील तेजश्री प्रकाशनाने प्रकाशित केला असून या संग्रहात सहृदयी व संवेदनशील मनाच्या डॉ.अच्युत माने यांच्या जीवनातील निवडक नि समृद्ध अशा ४१ आठवणींचे स्फुट लेख आहेत.मात्र या स्फूटलेखांचे स्व ' रुप ' केवळ स्वतः च्या आयुष्यातील घटना वा प्रसंग कथन करणे एवढेच नसून त्यामागचा उद्देश वाचकमनावर सकारात्मक विचारांचे बीजारोपण घडवून आणण्याचा आहे. म्हणूनच जरी हे स्फुट लेख आकाराने छोटे असले तरी त्यातून अगदी सहजसुंदरतेने पेरलेला विचार अधिक मोलाचा आहे,याची प्रचिती येते.**

वैयक्तिक अनुभूतीपर आणि सामाजिक चळवळीत कार्य करताना आलेल्या अनुभवांवर आधारीत असे या स्फुट लेखांचे ढोबळ मानाने आपणास वर्गीकरण करता येत असून या दोन्ही प्रकारच्या स्फुट लेखनातून फुले,शाहू आणि आंबेडकर यांच्या परिवर्तनवादी विचारधारेने विकसित झालेली लेखकाची सम्यक दृष्टी प्रत्ययास येते.पहिल्याच लेखात थोर समाज सेवक अण्णा हजारे यांच्या देशव्यापी आंदोलनाचे समीक्षण केले आहे,तर दुसऱ्या एका लेखात मराठवाडा विद्यापीठ नामांतराच्या चळवळीतल्या लेखकाच्या सक्रिय सहभागाची आठवण आहे.तसेच निपाणी येथील विडी कामगार महिलांच्या आंदोलनात सहभाग घेऊन मिळविलेले यशही एका लेखात नोंदवले आहे.सार्वजनिक विहिरीवर सर्वांनी मिळून पाणी भरण्याच्या हक्कासाठी केलेल्या आंदोलनाची दखलही घेतली आहे.याशिवाय महात्मा फुले, महात्मा गांधी,डॉ.बाबासाहेब आंबेडकर, आचार्य विनोबा भावे,स्व.यशवंतराव चव्हाण, कै.बाबा आमटे इत्यादिंचे तत्त्वनिष्ठ आचार आणि विचार काही लेखांतून उमटले आहेत. निपाणीचे ज्येष्ठ लेखक महादेव मोरे यांच्या लेखकीय कर्तृत्वाचा आणि बेरड रामोशी समाजाच्या उत्थानासाठी हयातभर संघर्ष केलेल्या ' बेरड ' कार डॉ.भीमराव गस्ती यांच्या कार्याचा नेटका आढावा घेतला आहे. तसेच निपाणी परिसरात दलित शोषित,मजूर आणि विडी कामगारांच्या सर्वतोपरी उत्थानासाठी अविरतपणे संघर्षरत राहणाऱ्या कार्यकर्त्यांच्या संघर्षाची नोंदही अगदी उत्कटतेने घेतली आहे.याशिवाय काही स्फुट लेखांतून लेखकाने प्रेमाविषयीची स्वतःची हळवी आणि नाजूक संकल्पना मांडून खरं प्रेम म्हणजे नेमके काय असते,याचे सार सांगितले आहे. तसेच लेखक स्वतः दलित असल्यामुळे त्यांना बालपणी खूप यातना नि दाहक अनुभव सोसावे लागले ; पण त्यांनी मनात कोणाविषयी कसलाच कडवटपणा न ठेवता घटनेचे शिल्पकार डॉ.आंबेडकर यांचा आदर्श समोर ठेवून त्यांनी परिश्रमपूर्वक उच्च शिक्षण घेतले आणि ते प्राचार्यपदी पोहोचले,हा सारा त्यांचा ' प्रेरणादायी ' जीवन प्रवासही इथे शब्दबद्ध झाला आहे. असो .. .. थोडक्यात प्रा.डॉ.अच्युत माने लिखित ' जीवनदृष्टी ' या स्फुट लेखसंग्रहातून लेखकाने स्वतःच्या आयुष्यातील समृद्ध अशा आठवणींचे व अनुभवांचे समृद्ध भांडार येथे अगदी सोप्या शब्दात नि अकृत्रिमतेने शब्दबद्ध केले असून ते भांडार वाचकाला उपयुक्त असे मार्गदर्शन करणारे आहेच ; पण त्यासोबतच सुख-दुःखाने व्यापलेल्या माणसाच्या खडतर आयुष्यात जीवनाकडे पाहण्याचा सकारात्मक दृष्टिकोनही निर्देशित करणारे आहे.मनोगतामधे स्वतःची भूमिका मांडताना लेखक म्हणतात त्याप्रमाणे ' मनातलं प्रकट करावं नि ते आपल्या सुहृदांना प्रांजळपणे सांगावं या तळमळीतून हे सारं प्रकटीकरण झालेलं आहे ' आणि म्हणूनच हे सकारात्मक ' दृष्टी ' देणारे हृदयस्पर्शी स्फुट लेखन वाचकांच्या पसंतीस पडेल,यात शंका नाही. या लेखसंग्रहाची पाठराखण करताना ज्येष्ठ विचारवंत डॉ.आ.ह.सांळुखे म्हणतात त्याप्रमाणे ' हे सारे लेखन विधायक स्वरूपाचे मार्गदर्शन करणारेही आहे ', हे नक्की ! लेखक प्रा.डॉ.अच्युत माने यांना पुढील लेखनासाठी मनःपूर्वक शुभेच्छा ! !

**जीवनदृष्टी - ( लेखसंग्रह )**
**लेखक - प्रा.डॉ.अच्युत माने**
**प्रकाशक - तेजश्री प्रकाशन,इचलकरंजी, जि.कोल्हापूर मो.८२७५६३८३९६**
**पृष्ठे - १५२**
**मूल्य - २५० रु.**




# अष्टदीप



दिलीप देशपांडे
मो.नं. ८९९९५६६९१७

आधुनिक केसरी

**देशपांडे सरांनी लिहिलेले "अष्टदीप" हे अत्यंत प्रेरणादायी आणि मनोवेधक पुस्तक वाचले. एका विशिष्ट वयोगटाची अर्थात विद्यार्थ्यांची मानसिकता बदलण्याच्या उदात्त हेतूने कांही निवडक भारतरत्न पुरस्कार विजेत्यांचे चरित्र असलेले हे पुस्तक असावे असा माझा समज होता. किंबहुना पुस्तकाचे मुखपृष्ठ बघून मला तसे वाटले, मात्र पुस्तकाचे अंतरंग कळल्याबरोबर हा समज निव्वळ गैरसमज होता असे कळले!**

हे पुस्तक सर्व वयोगटाच्या भारतीयच नव्हे तर अशा प्रत्येक व्यक्तीसाठी आहे, ज्यांना भारताचे अंतरंग जाणून घ्यायचे आहे! या देशाच्या परमपवित्र मातीतून अस्सल मोती कसे जन्माला येतात हे या पुस्तकाच्या वाचनातून कळते. यातील व्यक्ती कुणा एका प्रांताचे, भाषेचे, व्यवसायाचे किंवा आर्थिक दर्जाचे नाहीत. विविधतेत एकता हा भारताचा एकमेकाद्वितीय सद्‌गुण या पुस्तकात प्रकर्षाने जाणवतो. किंबहुना प्रत्येकाचे वैशिष्टय नजरेत ठळकपणाने भरावे, हाच लेखकाचा हेतू दिसतो. भारतमातेच्या चरणी विविध रंगांची व विविध गंधांची सुमने अर्पण करावीत, हा अनवट विचार या पुस्तकाच्या देशभक्तीने भारलेल्या लेखकाच्या विचारात असावा.

चारित्र्यवान व्यक्तींचे चरित्र लेखन लिहिणे कांही नवीन नाही पण सर्वोच्य नागरी पुरस्कार मिळालेल्या भारतातील आठ गौरवान्वित व्यक्तींविषयी लेखन करणे विश्वास सरांसारख्या सिद्धहस्त लेखकाला शक्य आहे. तारीखवार जन्म, मृत्यू, इतर सन्मान आणि असाच कागदी गोषवारा म्हणजे चरित्र नव्हेच, किंबहुना त्यापलीकडे जाऊन अतिसामान्य कौटुंबिक परिस्थिती, आर्थिक विपन्नता, पारंपारिक बंधने, सामाजिक विरोध इत्यादी प्रतिरोधांवर मात करीत या लोकोत्तर व्यक्तींनी मळलेल्या वाटा सोडून आपल्या लक्ष्याकडे जाणारा काटेरी मार्ग कसा पादाक्रांत केला हे महत्वाचे आहे. या सर्व मुद्द्यांचे त्या त्या व्यक्तीच्या चरित्र लेखनात प्रतिबिंब असायला हवे. बहुतेक वेळी आपल्यास त्या व्यक्तींचा खडतर प्रवास माहित नसतो, दिसते ते फक्त त्यांच्या प्रसिद्धी आणि सन्मानाने लखलखणारे तेजःपुंज प्रकाशाचे वलय! परंतु या प्रकाशाच्या वाटा त्यांना सहज गावल्या नाहीत, तिथवर पोचायला खाचाखळग्यांनी आणि काटेरी निवडुंगांनी भरलेली वाट चालतांना त्यांचे पाय रक्तबंबाळ नक्कीच झाले असणार. या आठ सन्मानित व्यक्तींच्या खडतर प्रवासाचे विस्तारित चित्रण या पुस्तकाचे मुख्य वैशिष्ट्य आहे. लेखनस्वातंत्र्याचे निकष लावूनही या जगप्रसिद्ध व्यक्तींच्या प्रतिमेला कुठेही तडा जाऊ नये, मात्र त्या व्यक्तीच्या जीवनातील वादग्रस्त बाबी, गैरसमज, जनमानसात रुजलेल्या कल्पना यांचाही परामर्श लेखकाने घेतलेला आहे, तेही सप्रमाण लेखन करून! माणूस जितका प्रसिद्ध, तितकी त्याच्या विरोधात सामग्री उपलब्ध असणारच. यात लेखकाचा खरा कस लागतो. या आठ व्यक्तींचा कालखंड बघता, हे काम लेखकाने अत्यंत निगुतीने केले आहे असे वाटते. प्रत्येक लेखाच्या शेवटी दिलेली संदर्भांची यादी लेखनाची पारदर्शकता दर्शवते. मात्र लेखकाने या संदर्भापलीकडे जाऊन त्या व्यक्तींच्या मनातले गूज ओळखले कसे आणि पुस्तकात चितारले कसे हा प्रश्न मला पडला! कांही ठिकाणी तर आपण त्या व्यक्तीची प्रकट मुलाखतच बघतोय असे जाणवत होते. ही लेखकाची कल्पनेची भरारी नसून, हे अत्यंत मेहनतीने, विचारपूर्वक आणि मुद्देसूद लिहिलेले रसाळ वाङ्मय आहे.

आजवर भारतरत्न या पुरस्काराने सन्मानित ४८ व्यक्तींमधून नेमक्या त्याच आठ व्यक्ती कां निवडल्या याचे उत्तर लेखकाने देणे मला तरी अपेक्षित नाही, मात्र ज्या व्यक्ती त्यांनी निवडल्या, त्यांच्या चरित्रलेखनात त्यांनी यत्किंचितही कुसूर केला नाही, उलट याच व्यक्ती कां, याचे उत्तर त्यांचे चरित्र वाचूनच सापडते. लेखकाच्या व्यक्तिस्वातंत्र्याचा मुद्दा आहेच, पण माझे मत आहे की भविष्यात सरांनी टप्याटप्याने या सर्वांचेच व्यक्तिचित्रण लिहावे आणि अष्टदीप या पुस्तकाच्या पुढील मालिका लिहाव्यात.

या पुस्तकात जी अष्टरत्ने आहेत त्यांची नांवेच किती आदरणीय आहेत बघा. मंडळी, त्यांच्या नांवाच्या आधी लागलेली बिरुदावली आणि अर्थवाही शब्द ( अनुक्रमणिकेत आहेत तसेच ) म्हणजे त्यांची अविभाज्य मानाची पदवी आणि त्यांच्या व्यक्तिमत्वाची अति संक्षिप्त रूपरेखा समजावी. निश्चयाचा महामेरू महर्षी धोंडो केशव कर्वे, द्रष्टा अभियंता सर विश्वेश्वरैया, लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल, द्रष्टा उद्योगपती जे. आर. डी. टाटा, निर्मळ चारित्र्याचे धनी ( साधी राहणी, उच्च विचारसरणी असलेला नेता ) लालबहादूर शास्त्री, अजातशत्रू नेता अटलबिहारी बाजपेयी, आनंदघन लता मंगेशकर आणि उज्ज्वल भारताचे स्वप्न पाहणारा द्रष्टा वैज्ञानिक डॉ. अब्दुल कलाम. या आठही व्यक्तींमधील मला जाणवलेला समसमान गुण म्हणजे देशभक्ती, आपल्या भारतभूमीला सर्वस्व वाहून टाकायची जबरदस्त उर्मी! त्यासाठी कितीही कष्ट, वेदना, मेहनत आणि जिवापाड प्रयत्न करण्याची दुर्दम्य आकांक्षा. 'भारत माझा देश आहे, त्यासाठी मी हे करणार आणि ते करणार' या वल्गना करणाऱ्या आजच्या वाचाळवीरांच्या पार्श्वभूमीवर, या व्यक्तींचे बावनकशी सोन्याहून पिवळे असे व्यक्तिमत्व उजळून दिसते. त्या लखलखीत प्रकाशात न्हाऊन निघण्याचा आणि नवचैतन्याने बहरून येण्याचा अनन्यसाधारण अनुभव घ्यायचा असेल तर हे पुस्तक आधी वाचावे, नंतर त्याचे मनन आणि चिंतन करून या व्यक्तींचे विचार प्रत्यक्षात जगणे, या पायऱ्या जमेल तशा आणि जमेल तितक्या चढाव्या! असे केल्यास लेखकाच्या या चरित्रलेखनाला न्याय मिळेल असे मला वाटते.




प्रत्येक व्यक्तीची शिकवण न्यारी अन निराळी, महर्षी कर्व्यांनी विधवांचे केलेले सामाजिक पुनरुत्थान व स्त्रीशिक्षणाचा रोवलेला पाया हे महाराष्ट्राच्या सीमा भेदून अखिल देशात फैलावले. सर विश्वेश्वरैयांनी निर्माण केलेली बांधकामाची आधुनिक तीर्थक्षेत्रे आजही दिमाखात उभी आहेत आणि आजच्या तकलादू बांधकामांना आव्हान देताहेत. लोहाला प्रतिष्ठा मिळवून देणारे लोहपुरुष म्हणजे भारताच्या अखंड साम्राज्याचे निर्मातेच! सत्तेचा माज आणि स्वायत्ततेचे विखारी स्वप्न बाळगणारे आणि भारताचा लचका तोडायच्या हेतूने आटोकाट स्वार्थी प्रयत्न करणारे तब्बल ५६५ संस्थानिक एका छत्राखाली आणणारे सरदारांचेही एकमेव सरदार वल्लभभाई पटेल! ऐश्वर्यसंपन्न असूनही निरलस आणि निरभिमानी, समाजकार्यात नंबर एक असे जे. आर. डी. टाटा, 'बस नाम ही काफी है', असा ब्रँड! साधी राहणी आणि उच्च विचारांचे धनी, आजच्या जगातल्या राजकारण्यांच्या संदर्भात आणि चौकटीत न बसणारे असे एकमेव पंतप्रधान लालबहादूर शास्त्री, सर्वपक्षीयांची निष्ठा अन आदर ज्यांना प्राप्त होता असे कविमनाचे हळवे पण तितकेच खंबीर पंतप्रधान अटलजी आणि वेगळ्या जडणघडणीतले सर्वप्रिय वैज्ञानिक अब्दुल कलाम यांसारख्या रत्नांचे चरित्रलेखन या पुस्तकात केलेले आहे.

शेवटी अति आदराने उल्लेख करते तिचा, जी आहे आपल्या सर्वांची लाडकी स्वरमाऊली लता मंगेशकर! तिचे चरित्र वाचावे, तिची स्वर्गीय गाणी ऐकावी हे ठीकच, पण ती 'लता' म्हणून घडली कशी याचे सांगोपांग वर्णन म्हणजे माळेत जसे मोती ओवतात आणि शेवटी मध्यभागी मेरुमणी जोडतात, तद्वतच लेखकाने या पुस्तकात लता दीदींची प्रदीर्घ कारकीर्द वर्णन केली आहे. यात जणू भारतीय सिनेसंगीताचाच सांगीतिक प्रवास आपण करतोय असे वाटते. लेखकाची संगीताची उत्तम जाण आणि लतादीदींवरील अपार भक्ती या भागात अधोरेखित झाली आहे. माझ्यासारख्या लताभक्तांसाठी ही खास पर्वणीच आहे.

मित्रांनो, लेखकाने या आठ व्यक्तिरेखांचा शोध घेता घेता आदर्श विचारांचे लक्ष लक्ष दीप उजळून टाकलेत, असा अनुपमेय अनुभव मला हे पुस्तक वाचतांना आला. विश्वास देशपांडे, चाळीसगाव. आ. बं. हायस्कूलचे सेवानिवृत्त मुख्याध्यापक आहेत. आजवर त्यांची सात पुस्तके प्रकाशित झाली आहेत. समाजमाध्यमांवर उगवतीचे रंग, प्रभात पुष्प, थोडं मनातलं, ही त्यांची सदरे वाचकप्रिय आहेत. रेडिओ विश्वासवर 'आनंदघन लता', 'या सुखांनो या' आणि 'राम कथेवर बोलू कांही' या कार्यक्रमांच्या मालिका अतिशय लोकप्रिय आहेत. त्यांचे स्वतंत्र यू ट्यूब चॅनल देखील आहे.

'पुस्तक विश्व, पुणे' मध्ये हे पुस्तक 'बेस्ट सेलर' च्या यादीत आले आहे. जुलै २०२२ मध्ये प्रकाशित झालेले हे पुस्तक संग्रही ठेवावे आणि इतरांना देखील वाचायला प्रेरित करावे असे वाटते.

**फोन नं. ९९२०१६७२११**
**प्रकाशक-विश्वकर्मा पब्लिकेशन्स**
**पृष्ठसंख्या - ३०० पाने**
**पुस्तकाचे मूल्य- ४२५ रुपये**

# दैनंदिन नवचैतन्याचा ऊर्जास्रोत असणार वृत्तपत्र लोकशाहीचा तिसरा नेत्र

आधुनिक केसरी



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

सामाजिक पातळीवर विश्वासार्हता टिकवण हे सगळ्यात मोठं आव्हान असत. आणि हेच कठिण आव्हान सहज पेलवत दैनंदिन वेगवेगळ्या वयोगटातील वाचकांच्या पसंतीस उतरलेली वृत्तपत्र हि दैनंदिन जीवनात नव चैतन्य निर्माण करणार माध्यम आहे. जे सत्याचा वाली, न्यायाचा आधारस्तंभ लोक भावनांच प्रतिक जनमनाचा आरसा उत्कृष्ट शब्दांचा खजाना प्रंचड उर्जा स्त्रोत, म्हणून आपण त्या कडे खुप मोठ्या आशेने पाहतो. हिच आशा अपेक्षा पुर्ण करत कसोटीवर खरं उतरण्याची किमया करत वृत्तपत्राने जगातिक पातळीवर आपलं स्वतःचं एक वेगळ असं स्थान निर्माण केलं आहे. त्याच बरोबर हे स्थान दैनंदिन उंची गाठत असताना लोक अपेक्षेवर खरं उतरत आहे. म्हणून आपल्या दैनंदिन जीवनातील अविभाज्य घटक व लोक चळवळ गतिमान करण्याचं माध्यम म्हणून वृत्तपत्रा कडे पाहिलं जातं. हे समाजाला योग्य दिशा देणार माध्यम असल्याने आपल्या दिवसाची सुरुवात हि आपण सकाळी सकाळी झोपेतून उठल्या बरोबर अगोदर चहा कॉफी नास्ता न करता प्रथम वृत्तपत्र वाचतो. अथवा नास्ता करताना वृत्तपत्र वाचल्याशिवाय सकाळी सकाळी चैतन्य युक्त वाटत नाही. हे वास्तविक सत्य असुन हे सत्य कोणीही नाकारू शकत नाही. कितीही महत्वाचं काम असु द्या किमान वृत्तपत्रावर नजर टाकल्या खेरीज आपला दिवस पुर्ण होत नाही. म्हणजे मानवी जीवन आणि वृत्तपत्र यांच परस्परांशी किती घनिष्ठ नाते संबंध आहे. हे या सगळ्या घडामोडींमुळे स्पष्ट होत. दिवसभरात वृत्तपत्र वाचलं नाही असा कोणीही व्यक्ती शोधून सापडणार नाही. म्हणजे मानवी जीवनातील वृत्तपत्राच अनन्यसाधारण असं महत्व आहे. एकंदरीत दिवसाची सुरुवात करणार वृत्तपत्र हे दैनंदिन जीवनात एक नवी ऊर्जा प्रदान करत चैतन्य निर्माण करणार ठरत. वृत्तपत्र हे लोकशाहीचा तिसरा नेत्र असला तरी हा नेत्र सदैव गतीशील राहण्यासाठी ज्यांच अनमोल योगदान असतं ते आधारस्तंभ संपादक, सहायक संपादक, प्रतिनिधी, वार्ताहर, पत्रकार हे अनमोल रत्न वृत्तपत्र चालण्यासाठी योगदान देत असतात. तर वाचक वर्ग हा वृत्तपत्राच्या कार्याला प्रोत्साहान देत असतो. वृत्तपत्र समुहात कार्यरत सर्व अनमोल रत्न यांच्या सगळ्यांच्या प्रचंड मेहनतीने नावारूपाला येणार वृत्तपत्र हे लोक जागृती करणार उत्तम माध्यम ठरत असत. आपल्या देशातील धार्मिक परंपरेनुसार फक्त सृष्टीचे संहारक भगवान महादेव यांना तिसरा नेत्र आहे. आणि एकादा का तिसरा नेत्र उघडला कि मग कोणाचीही खैर नाही. तसंच जागतिक पातळीवर कोणत्याही क्षेत्रातील विषयाच्या अनुषंगाने एकदा का एखादा वृत्तपत्र सत्याचा वेध घेण्यासाठी सरसावल तर मग त्या समोर कोणीही असो त्याची खैर नाही आणि न्याय मिळेपर्यंत वृत्तपत्र आपली जबाबदारी आणि कर्तव्य निष्ठापूर्वक पुर्ण करत राहतं त्या मध्ये मागे हटणे हा विषयच राहत नाही. म्हणून जगातिक पातळीवर लोकशाहीचा तिसरा नेत्र म्हणून आपण वृत्तपत्रा कडे पाहतो. देशाच्या पातळीवर असो जागातीक पातळीवर लोकशाही मुल्य लोकांचे अधिकार अबाधित राखण्यासाठी सर्व सामान्य माणसाला न्याय मिळवून देण्यासाठी सदैव तत्पर असणार माध्यम म्हणून आपण ज्या कडे पाहतो ते वृत्तपत्र म्हणजे लोकाशाहिचा तिसरा नेत्र आहे. या मध्ये काही शंका नाही. याच वृत्त पत्राचे नाव लौकीक करण्यासाठी बाब छोटी असो कि मोठी पण त्याच्या मुळाशी जाऊन अगदी वेळ प्रसंगी स्वतःचा जीव धोक्यात घालून वृत्तांकान करणारे व्यक्तिमत्व म्हणून आपण ज्यांचा कडे आदराने पाहतो ते व्यक्तिमत्व म्हणजे पत्रकार असल्याने जगाच्या दृष्टीने मानवी मुल्य अधिकार न्याय,या दृष्टीने खुप महत्वपूर्ण आहे.जगातीक पातळीवर सुद्धा मानवता मानवी अधिकार, लोकशाही समता, प्रस्थापित करण्या बरोबरच जगातीक पातळीवर शांतता अबाधित राखण्यासाठी पत्रकारिता हे खुप महत्वाचे माध्यम असल्याने पत्रकार हे निष्पक्ष निर्भिड, आणि वेगवेगळ्या क्षेत्रातील अत्यन्त बारीकसारीक बाबींचा वेध घेत अहोरात्र स्वतःच जीवन लोक कल्याण लोक जागृती व लोकशाहिच्या रक्षणासाठी समर्पित करत असतात. लोकशाही मध्ये तिसरे नेत्र असणार वृत्तपत्र मजबुती ने टिकविण्यासाठी त्याचे मजबुत खांब म्हणून सन्माननीय संपादक, पत्रकार, वृत निवेदक हे खुप महत्वपूर्ण जबाबदारी पार पाडत त्या माध्यमातून तिसरा नेत्र मजबूत करण्यासाठी अहोरात्र धडपड करत असतात. मानवी मनाला चैतन्य देण्या बरोबरच एक उत्तम विरंगुळा म्हणून आपल्या सगळ्यांच्या आवडीच माध्यम असणार वृत्तपत्र आणि आज या वृत्तपत्राचा जगातिक पातळीवर स्वातंत्र्य दिन आहे. त्या निमित्ताने सर्व दैनिक वृत्तपत्र मा संपादक मा सहायक , संपादक, दैनिक प्रतिनिधी, वार्ताहर,वाचक यांना मनापासून शुभेच्छा



# महावितरणमध्ये गुणवंत कर्मचाऱ्यांचा गौरव

## सहव्यवस्थापकीय संचालक डॉ. मंगेश गोंदावले यांच्या हस्ते ध्वजारोहण

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** महावितरणच्या छत्रपती संभाजीनगर प्रादेशिक व परिमंडल कार्यालयात महाराष्ट्र दिन तसेच कामगार दिन उत्साहात साजरा करण्यात आला. सहव्यवस्थापकीय संचालक डॉ.मंगेश गोंदावले यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यानिमित्त सहव्यवस्थापकीय संचालक डॉ.मंगेश गोंदावले व मुख्य अभियंता सचिन तालेवार यांच्या हस्ते उत्कृष्ट कामगिरी बजावलेल्या तांत्रिक कर्मचाऱ्यांचा सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रमास अधीक्षक अभियंता संजय सरग, मोहन काळोगे, प्रभारी अधीक्षक अभियंता सतीश खाकसे, प्रभारी महाव्यवस्थापक (वित्त व लेखा) लक्ष्मीकांत राजेल्ली, सहायक महाव्यवस्थापक (मानव संसाधन) शिल्पा काबरा, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी विश्वास पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

याप्रसंगी सहव्यवस्थापकीय संचालक डॉ. मंगेश गोंदावले म्हणाले की, पुरस्कार म्हणजे कर्मचाऱ्यांच्या पाठीवर दिलेली कौतुकाची थाप आहे. पुरस्कारप्राप्त कर्मचाऱ्यांनी यापुढेही अधिक चांगले काम करावे आणि इतरांनीही त्यापासून प्रेरणा घ्यावी. महावितरणचे सर्वच कर्मचारी उत्तम काम करत आहेत. मात्र काम करताना तांत्रिक कर्मचाऱ्यांचा दुर्दैवाने विद्युत अपघातात मृत्यू होतो. यावर सर्वांनी गांभीर्याने विचार करावा. आगामी वर्षात कुणाचाही प्राणांतिक अपघात होणार नाही, असा संकल्प करूया. मुख्य अभियंता सचिन तालेवार म्हणाले की, महावितरण ही सार्वजनिक सेवा कंपनी आहे. जनतेची सेवा करणे हे आपले काम आहे. ग्राहकांना उत्कृष्ट व तत्पर सेवेसह अखंडित वीजपुरवठा देणे आणि खंडित वीजपुरवठा वेळेत पूर्ववत करणे हे काम अधिक प्रभावीपणे करण्याचा संकल्प करूया. अधीक्षक अभियंता संजय सरग यांनी विद्युत अपघात टाळण्यासाठी तांत्रिक कर्मचाऱ्यांनी सुरक्षा साधनांचा वापर करण्याचे तसेच सुरक्षेचे नियम काटेकोरपणे पाळण्याचे आवाहन केले. यावेळी मेडिकव्हर रुग्णालयाच्या वतीने सर्व गुणवंत कर्मचाऱ्यांना भेटवस्तू देण्यात आली. डॉ.राहुल रुईकर यांनी किडनीच्या आजारापासून दूर कसे राहावे याबाबत मार्गदर्शन केले. अतिरिक्त कार्यकारी अभियंता अतुल देवकर, कामगार संघटनांचे पदाधिकारी अरुण पिवळ, श्रावण कोळनूरकर यांनीही मनोगत व्यक्त केले. यावेळी कार्यकारी अभियंता प्रेमसिंग राजपूत, प्रवीण दांडगे यांच्यासह अधिकारी-कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रमुख लिपिक जयश्री कांबळे, फारूक शेख, सागर अग्रवाल यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमाचे फेसबुक लाईव्ह करण्यात आले.

पुरस्कारप्राप्त कर्मचारी पुढीलप्रमाणे : शहर मंडल – अभयकुमार महाजन, तुळशीदास बढे, रवींद्र दहीकर, रवी साळवे, रवींद्र दाभाडे, भागवत गव्हाणे, तुळशीराम सपकाळ, पंढरीनाथ शिंदे, गणेश पालोदकर, विलास कोरडे, लव चकाले. ग्रामीण मंडल – अर्जुन टेके, सुधीर गोरे, रघुनाथ जैवळ, अशोक तिखे, ईश्वर मुळे, योगेश जैस्वाल, योगेश मालोदे, विशाल भोकरे, राजेंद्र जगताप, सुधीर शिंदे, वसंत अव्हाळे, विजय झोंड, सय्यद इम्रान, कृष्णा साळवे, राजेंद्र कोचे, शिवप्रसाद लिंगायत, किरण परिसकर. जालना मंडल – संजय मगरे, शरद धनवई, कृष्णा गावंडे, गजानन गिरी, परमेश्वर चव्हाण, सुनील बनकर, विनोद नामदे, गजानन गोधे, शिवाजी पठाडे, विलास खरात, ज्ञानेश्वर बोराडे, बालाजी खरात. विशेष गुणगौरव पुरस्कार : ज्ञानेश्वर आर्दड, रमेश शिंदे, नवनाथ पवार. बाह्यस्रोत कंत्राटी वाहनचालक सय्यद अल्ताफ यांचाही यावेळी विशेष सत्कार करण्यात आला.





# वृद्धाश्रमातील वृद्धांसोबत केला वाढदिवस साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**चिखली :** सामाजिक कार्याची जान ठेवत पत्नीच्या वाढदिवसाला पत्नी, मुले व इतर नातेवाईक यांना मोठया हॉटेलमध्ये मेजवानी न देता होणारा समाजात आदर्श निर्माण करीत ऋणानुबंध समाज विकास संस्था चिखली द्वारा संचालित तुकाराम आश्रय वृद्धाश्रम भोकर येथील वृद्धासोबत पत्नी चा वाढदिवस साजरा करून वृद्धाश्रमास पाच हजार रुपये ची आर्थिक मदत केली.सविस्तर असे की, वित्त विभागातून सेवा निवृत्त झालेले उपकोषागार अधिकारी देवानंद खंडाळे हे नोकरीत असतानापासून सामाजिक धार्मिक कार्यात सदा अग्रेसर आहे गरजूना भोजन कपडे आर्थिक मदत बहुजन चळवळीला शक्य ती मदत करून सहकार्य करणारे समाजसेवक यांनी तुकाराम आश्रय वृद्धाश्रमात वाढदिवस साजरा केला. देवानंद खंडाळे यांनी दानशूर लोकांनी मदतीचा हात पुढे करून सहकार्य करण्याचे आवाहन केले यावेळी वृद्धाश्रमातील संख्या बघून त्यांच्या पत्नी सुनंदा खंडाळे भारावून गेल्या त्यांना अश्रू अनावर झाले असे कसे आपल्या जन्म दाते आई वडील यांना मुलं वृद्धाश्रमात सोडतात हे पाहून त्यांना खूप दुःख वाटले याउलट वृद्धाश्रमातील वृद्धाची सेवा बघून प्रशांत डोंगरदिवे व रुपाली डोंगरदिवे यांचे कौतुक केले यावेळी वृद्धाश्रमातील वृद्धासह देवानंद खंडाळे, सुनंदा खंडाळे हर्ष दीप खंडाळे, बागेश्री खंडाळे, ग्रामपंचायत सदस्य संदीप डोंगरदिवे, राजू डोंगरदिवे, द्वारका घेवंदे, कावेरी डोंगरदिवे, विहान डोंगरदिवे, उत्तम महाराज डोंगरदिवे, देऊबाई डोंगरदिवे, हे उपस्थित होते कार्यक्रम चे सूत्रसंचालन प्रशांत डोंगरदिवे यांनी तर आभार प्रदर्शन प्रियांका वानखेडे यांनी केले.





गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर

# प्रा.नारायण कोलते यांना आदर्श मुख्याध्यापक पुरस्कार प्रदान

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथील शिवाजी विद्यालयाचे प्राचार्य नारायण ( पंजाबराव )रायभान कोलते पाटील यांना दि.३०/४/२३ ला डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र छत्रपती संभाजीनगर येथे मुख्य संपादक समाधान वाणी, उपसंपादक उमेश नेमाडे, सहसंपादक गोकुळसिंग राजपूत साप्ताहिक सत्यशोधक दर्पण परिवाराकडून सत्यशोधक वर्धापन दिनानिमित्त हा समाज गौरव, आदर्श मुख्याध्यापक पुरस्कार प्रदान करण्यात आला. ग्रामीण भागात शिक्षणांची सोय उपलब्ध करून देणे व खासकरून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची गैरसोय होती तेव्हा मा उच्च न्यायालयात दाद मागून जय कालिंका देवी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष भावराव कोलते व पदाधिकारी यांच्या सहकार्याने ज्युनिअर व सिनिअर महाविद्यालय आणून वरिष्ठ शिक्षणाची सोय निर्माण केल्याबद्धल व प्रशासनात उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल त्यांना हा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले या पुरस्कार सोहळ्याचे कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा.डॉ.बाळासाहेब वाल्हेकर संचालक बिवेल्स डिफेन्स अकॅडमी, उद्‌घाघाटक : जयश्री सोनकवडे उपायुक्त समाज कल्याण व डॉ संजय राठोड ( अधिष्ठाता: शासकीय महाविद्यालय व घाटी, श्रीमती नंदा गायकवाड उपायुक्त मनपा संभाजीनगर, इंजी मधुसूदन कांडलीकर कार्यकारी अभियंता सा.बां. विभाग जालना, मा.भीमराव नाडे अधिक्षक सीजीएसटी संभाजीनगर उपस्थित होते.

या पुरस्काराचे अध्यक्ष डॉ संजय राठोड यांच्या हस्ते क्रांतीसुर्य महात्मा फुले डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त व सत्यशोधक दर्पण वर्धापन दिनानिमित्त समाजगौरव आदर्श मुख्याध्यापक हा पुरस्कार प्राचार्य नारायण ( पंजाबराव ) कोलते पाटील यांना प्रदान करण्यात त्यांना शाल श्रीफळ, स्मृतिचिन्ह व सन्मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी विविध क्षेत्रातील अधिकारी व पत्रकार, मान्यवर उपस्थित होते याप्रसंगी उपस्थित मान्यवरांनी नारायण रायभान कोलते पाटील सामाजिक कार्यकर्ते यांना पुढील वाटचालीच्या खूप शुभेच्छा दिल्या.यावेळी परिसरातून भाजपा जिल्हा उपाध्यक्ष जयप्रकाश चव्हाण, उत्तम चव्हाण तंटामुक्ती अध्यक्ष, शांताराम खराटे,दिनेश चव्हाण संघ,शंकर खराटे, संजय चव्हाण, शिवाजी मानकर, शिक्षकवृंद आदीसह शुभेच्छाचा वर्षाव होत आहे.





# नादरपूर येथे महाराष्ट्र दिन तथा कामगार दिन उत्साहात साजरा..!

आधुनिक केसरी न्यूज

**पिशोर :** महाराष्ट्र दिन तथा कामगार दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. नादरपूर येथील शेतीला जोड धंदा म्हणून मशरूम शेती करणारे तसेच मशरुम शेतीचे प्रशिक्षण जिल्ह्यात तथा जिल्ह्याबाहेर उमेद अभियान अंतर्गत बीड जिल्ह्यात प्रशिक्षण देणारे श्री दिनेश तेजराव निकम यांचे हस्ते त्यांचा सन्मान म्हणून ग्राम पंचायत कार्यालयाचा ध्वजारोहनाचा मान देण्यात आला. तसेच छत्रपती संभाजीनगर सह.बँकेच्या ध्वजारोहनाचा मान सर्व क्षेत्रात कुशल काम करणारे कुशल कारागीर श्री दिलीप महादू चौतमहाल यांना देण्यात आला. तसेच जि.प.प्राथमिक शाळेच्या ध्वजारोहनाचा मान दाल मिल चे मालक व कामगार रघुनाथ नामदेव निकम यांना देण्यात आला.यामध्ये प्रामुख्याने शालेय समितीच्या वतीने शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना जेवणासाठी टिफिन डबे वाटप करण्यात आले. याप्रसंगी सरपंच, उपसरपंच, ग्रामसेवक,ग्रा.पं.सदस्य,शालेय समिती अध्यक्ष, उपाध्यक्ष,सदस्य,तंटा मुक्ती अध्यक्ष, उपाध्यक्ष, सदस्य, वि. वि. कार्यकारी सोसायटी चे व्हा. चेअरमन,सदस्य, नादरपूर ऍग्रो प्रोड्युसर कं. चे अध्यक्ष,सचिव,संचालक,पोलीस पाटील,आरोग्य सेविका, तथा सर्व ग्रामस्थ मोठ्या संख्ये ने उपस्थित होते.

केंद्र सरकारच्या नियम नुसार मौजे नादरपूर येथे नादरपूर ऍग्रो प्रोडूसर कंपनी, ग्रामपंचायत चे पुढाकाराने नोंदणी करण्यात आली आहे . याचा मुख्य उद्देश, शेतकरी पिकवत असलेला माल प्रक्रिया करून विकणे हा आहे . यासाठी केन्द्र सरकार बिना तारण कर्ज देते, त्यासाठी 300 शेतकरी कंपनी चे सभासद असणे आवश्यक आहे . भविष्यात सदर कंपनी अनेक प्रकारचे उद्योग सुरू करणार आहे जेने करुन नवतरुण तरुणांना रोजगार मिळेल . सध्या स्थितीत कंपनी चे जवळपास 100 सभासद झाले असून त्यातून रू .5 लक्ष भाग भांडवल जमा झाले आहे . त्यातून कंपनी ने पत्रावळी उद्योग सुरू केला आहे . त्यापासून दोन तरुणांना रोजगार मिळाला आहे . व परिसरातील नागरिकांना होल सोल दरात पत्रावळी , द्रोण विकण्यात येत आहे .
**सविता दिलीप निकम, सरपंच ग्रामपंचायत नादरपूर तथा अध्यक्ष, नादरपूर ऍग्रो कंपनी लिमिटेड .**

महाराष्ट्र व कामगार दिनाच्या हार्दिक शुभेच्छा
आपले मुलगा / मुलगी सद्य परिस्थितीत स्वतःचे सरंक्षण करण्यात सक्षम आहेत का ?
त्यांना तनाने आणि मनाने कणखर बनवण्यासाठी
आम्ही येतोय आपल्या जवळच
विश्वस्त जागृत हनुमान मंदीर, विद्यानगर यांच्या सौजन्याने
जूदो प्रात्यक्षिक
आणि
मोफत जूदो व स्वःसरंक्षण शिबीर
१ मे ते ७ मे २०२३ पर्यंत
स्थळ : जागृत हनुमान मंदीर, विद्या नगर
आयोजक
औरंगाबाद जिल्हा जूदो संघटना
श्री. अजित मुळे - अध्यक्ष
श्री. अतुल बामनोदकर - सचिव, ब्लॅकबेल्ट प्रशिक्षक
श्री. दत्ता आफळे - ४ दान ब्लॅकबेल्ट व चेअरमन तांत्रीक समिती
श्री. चंद्रशेखर पोळ - ब्लॅक बेल्ट, प्रशिक्षक
श्री. दत्तु पवार - प्रशिक्षक
सौ. दिप्ती शेवतेकर-नावंदे - ब्लॅकबेल्ट, राष्ट्रीय प्रशिक्षक
मुंबई पब्लीक ट्रस्ट क्रमांक F-779 (सो. रजि. क्र. MAH-28/8/-AGD) सलग्न महाराष्ट्र जूदो संघटना
अधिक माहितीसाठी संपर्क
श्री. चंद्रशेखर पोळ 9158882849, श्री. दत्तु पवार 992388839
श्री.अतुल बामनोदकर - 9881067338

# बनोटी गावात मोठी खळबळ थेट पाच ग्रामपंचायत सदस्य अपात्र

## सरपंच, सदस्यांना सरकारी जागेवरील अतिक्रमण भोवले

आधुनिक केसरी न्यूज

**राजकीय वर्तुळात खळबळ :** बनोटी ग्रुप ग्रामपंचायतच्या सरपंच, चार सदस्यांनी सरकारी जागेवर अतिक्रमण केल्या प्रकरणी ग्रामपंचायत अधिनियमातील तरतुदीनुसार जिल्हाधिकाऱ्यांनी अपात्रतेची कारवाई केल्याने सोयगाव तालुक्यात राजकीय वर्तुळात एकच खळबळ उडाली आहे . या कारवाई नंतर संबंधितांच्या प्रभागात पोटनिवडणूक लागणार की ग्रामपंचायतवर प्रशासक राज येणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे .

**छत्रपती संभाजीनगर :** जिल्ह्यात राजकीयदृष्ट्या महत्वाच्या समजल्या जाणाऱ्या सोयगाव तालुक्यातील बनोटी ग्रुप ग्रामपंचायतच्या सरपंच व चार सदस्यांवर सरकारी जागेत अतिक्रमण केल्याप्रकरणी अपात्रतेची कारवाई करण्यात आल्याने बनोटी गावात एकच मोठी खळबळ उडाली आहे. बनोटी गावात ग्रामपंचायत ही ११सदस्यीय ग्रामपंचायत आहे.जानेवारी २०२० मध्ये झालेल्या निवडणूकीत ही बॉडी गठीत झाली होती.सन २०२५ पर्यंत यांचा कार्यकाळ पूर्ण होणार होता मात्र,तक्रारदार धनंजय भास्कर पाटील, स्वप्नील साहेबराव पाटील, व नाना विठ्ठल पाटील सर्व बनोटी यांनी छ.संभाजीनगर येथे अप्पर जिल्हाधिकाऱ्यांकडे सरपंच व चार सदस्यांविरोधात तक्रार अर्ज दाखल केला होता.यात म्हटले होते की,बनोटी ग्रुप ग्रामपंचायतच्या ५ सदस्यांनी



सरकारी,ग्रामपंचायतीच्या जागेत अतिक्रमण केले असून सरकारी जागेचा बेकायदा वापर व उपभोग घेतला आहे. त्यामुळे त्यांचे सदस्यत्व कायद्याने अपात्र असल्यामुळे त्यांचे सदस्यत्व रद्द करण्यात यावे,अशी मागणी या अर्जाद्वारे करण्यात आली.यासाठी ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे कलम १४ ( त्र ) ( ३ ), कलम १६ चा संदर्भ देण्यात आला.या अर्जावर जिल्हाधिकारी अस्तिक कुमार पाण्डेय यांच्या दालनात वेळोवेळी सुनावणी झाली. अर्जदाराने सादर केलेली कागदपत्रे, ग्रामसेवक व गटविकास अधिकारी यांचे अहवाल तपासून जिल्हाधिकारी यांनी अर्जदारांचा विवाद अर्ज मंजूर करून सरपंच मुरलीधर येहळे,सदस्य रेखाबाई सुनील पाटील, हिराबाई चव्हाण,नाजियाबी हनीफ शेख,रेखाबाई जैन अशा ५ सदस्यांना सदस्यपदी राहाण्यास अपात्र ठरवत त्यांचे ग्रामपंचायत सदस्यत्व रद्द करण्याचे आदेश दिले आहेत.सदरील तक्रारदाराचे ॲड जी.जे.पहिलवान यांनी काम पाहिले.

RAHUL S. ANCHALKAR
9850500629, 9325727798
R.R. Enterprises
घर तुमचे... इंटरीयर आमचे !
आपल्या घरातील आतील संपूर्ण सजावट आम्ही करू, वेल डेकोर फर्नीचर, किचन ट्रॉलीज, सोफा, बेड सर्वकाही तुमच्या स्वप्नाप्रमाणे
Add. : N-8, Behind Onkar Gas, CIDCO, Aurangabad-431 003
E-mail : anchalkarrahul@gmail.com
Web:rrenterprises.com

# फुलंब्री बाजार समितीवर भा.ज.पा.चे. वर्चस्व

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीत काँग्रेसच्या मागील गेल्या पंधरा वर्षांच्या सत्तेला सुरुंग लावीत भाजपने एकहाती सत्ता मिळविली आहे. या निवडणुकीत भाजपला शिवसेना शिंदे गटाचे किशोर बलांडे यांची साथ मिळाल्याने या पॅनलने अठरापैकी १४ जागेवर विजय मिळविला आहे. तर दुसरीकडे शिंदे गटातील ठोंबरे यांच्या पॅनलला दोन जागा मिळाल्या असून महाविकास आघाडीला एका जागेवर समाधान मानावे लागले. हमाल व मापारी मतदारसंघात नवखा कार्यकर्ता निवडून आला. बाजार समितीच्या निवडणुकीत भाजपाने प्रभावशाली उमेदवार उभे करत सुरवातीपासून प्रचारात आघाडी घेतली होती. काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस व शिवसेनेचा ठाकरे गटही संपूर्ण ताकदीनिशी मैदानात उतरला; मात्र वरुण पाथ्रीकर हे एकमेव उमेदवार विजयी झाले. अपक्ष म्हणून हमाल मापाडी मतदारसंघातून नवख्या अझहरसय्यद यांनी बाजी मारली. व्यापारी मतदारसंघातून विद्यमान संचालक राजेंद्र ठोंबरे व श्रीराम म्हस्के पुन्हा विजयी झाले.विजयी उमेदवार सहकारी संस्था मतदारसंघ : अप्पासाहेब काकडे, किशोर बलांडे, दत्तात्रय करपे, विवेक चव्हाण, योगेश जाधव,शिवाजी पाथ्रीकर, अनुराधा चव्हाण, सविता फुके, माधवराव जाधव, सुहास शिरसाठ, ग्रामपंचायत मतदारसंघ : जगन्नाथ दाढे, सर्जेराव मेटे, रोशन अवसरमल, वरुण पाथ्रीकर. व्यापारी मतदारसंघ : राजेंद्र ठोंबरे, श्रीराम म्हस्के, हमाल मापाडी मतदारसंघ : अझहर सय्यद.





## वावना येथे महाराष्ट्र दिन

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यातील वावना येथे दि.०१ रोजी सोमेश्वर सार्वजनिक वाचनालय वावना ता.फुलंब्री जी.छ. संभाजीनगर येथे महाराष्ट्र दिन उत्साहात साजरा करण्यात आला यावेळी ग्रामपंचायत सदस्य सविता जाधव यांच्या हस्ते महात्मा गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन करून ध्वज फडकविण्यात आला. यावेळी सरपंच भागाबाई काकडे माजी सरपंच जाधव सोसायटी चेअरमन योगेश जाधव मुख्याध्यापिका जी.प्र.शाला कस्तुरे मॅडम शिक्षक पवार सर व शालेय विद्यार्थिनी व समस्त वाचक समस्त वाचक व गावकरी उपस्थित होते ज्ञानेश्वर जाधव संचालक सार्वजनिक वाचनालय यांनी आभार मानले.

## हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना

आधुनिक केसरी न्यूज



**खुलताबाद :** मुंबई येथे डिजिटल दवाखान्याचे अनावरण एकनाथ शिंदे, मुख्यमंत्री, यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाचे लाईव्ह उद्घाटन आ. प्रशांतजी बंब यांच्या हस्ते फीत कापून खुलताबादेत ऑनलाईन उद्घाटन नगरपालीका परिसरात करण्यात आले. या कार्यक्रमासाठी प्रशांतजी बंब, डॉ. अभय धानोरकर, अति. जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद औरंगाबाद, हे जिल्हास्तरीय अधिकारी उपस्थित होते, तसेच प्रविण सुरडकर, गट विकास अधिकारी, विक्रम दराडे, मुख्याधिकारी, डॉ. किरण शिंदे, तालुका आरोग्य अधिकारी, प्रकाश वाकळे( भाजपा तालुका अध्यक्ष, ) दिनेशभाऊ अंभोरे ( मा. उपसभापती, ). सुरेश मरकड, मा. नगराध्यक्ष, सतीश दांडेकर, परसराम बारगळ, योगेश बारगळ, आशिष कुलकर्णी, सय्यद अफसर, शशिकांत ससाणे, विस्तार अधिकारी आरोग्य. डॉ. दीपक राऊत, वैद्यकिय अधिकारी या कार्यक्रमासाठी ज्ञानेश्वर हारदे, संजय पाटील, वाहब पटेल, पुंडलिक सोनवणे, प्रतीक्षा पवार, संध्या चव्हाण, व पूजा मडकर यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले. या कार्यक्रम प्रसंगी बोलताना आ. बंब म्हणाले की खुलताबाद येथील नागरिकांनी या दवाखान्यात देण्यात येणाऱ्या सुविधांचा लाभ घ्यावा, याठिकाणी डॉकटर व स्टाफ देण्यात आला असून या सुविधांचा लाभ घ्यावा असे सर्वाना आवाहन आमदार प्रशांत बंब यानी नागरिकाना केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शशिकांत ससाणे विस्तार अधिकारी आरोग्य, यांनी केले व प्रास्ताविक डॉ. किरण शिंदे तालुका आरोग्य अधिकारी यांनी केले व ज्ञानेश्वर हारदे यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले.

## खुलताबाद तालुक्यात 'मन की बात'चे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज



**खुलताबाद :** पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या अमृतवाणीतून मन की बातच्या माध्यमातून देशातील नागरिकाना 100 व्या भागातून मार्गदर्शन करण्यात आले. रत्नपूर-खुलताबाद तालुक्यातील 95 बुथपैकी 90 बुथवर मन की बात कार्यक्रमाचे आयोजन मा आमदार प्रशांत बंब साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले या कार्यक्रमात 1820 नागरिकानी सहभाग घेतला भडजी येथे मोदीजीचे अनमोल मार्गदर्शन ऐकताना भडजी बुथ क्रमांक 72 येथे मन कि बात कार्यक्रम पाहताना नागरिकासोबत तालुकाध्यक्ष प्रकाश वाकळे, सरपंच बाबासाहेब वाकळे, उपसरपंच राजु वाकळे, मच्छिंद्र वाकळे, विजय वाकळे, सुधाकर वाकळे,कचरू वाकळे,भगवान वाकळे,गोरक्षनाथ वाकळे, काशिनाथ वाकळे, छबु वाहुळ, वाल्मीक वाकळे,संजय वाकळे,सुमनबाई आंबे, छबाबाई वाकळे, तसेच गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महाराष्ट्र दिन व कामगार दिनानिमित्त महाविद्यालयात ध्वजारोहण

आधुनिक केसरी न्यूज

**घोडेगाव :** 01 मे रोजी राजमाता जिजाऊ वरीष्ठ महाविद्यालय व राजीव गांधी कनिष्ठ महाविद्यालय व सद्गुरू जनेश्वर माध्यमिक विद्यालय घोडेगाव येथे आज 1 मे महाराष्ट्र दिन व कामगार दिन निमित्त महाविद्यालयात ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष साईनाथ पाटील जाधव साहेब, प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेच्या पदाधिकारी श्रीमती अनिताताई जाधव मॅडम व संजय ठाकूर सर ( ग्रंथालय विभाग ) हे उपस्थित होते. सद्गुरू जनेश्वर माध्यमिक विद्यालय येथे ठाकूर साहेबांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले, तर वरीष्ठ महाविद्यालय येथे श्रीमती अनिताताई जाधव मॅडम यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. उपस्थित विद्यार्थ्यांना महाराष्ट्र दिनानिमित्त मोलाचे मार्गदर्शन केले.

यावेळी प्रशासकीय अधिकारी संदिप जाधव सर, प्राचार्य डी.डी. घुगे सर, शाळेचे मुख्याध्यापक खैरनार सर, प्रा.तुकाराम जाधव सर, प्राध्यापिका ठाकूर मॅडम, प्रा. नलावडे सर, प्रा. फुलारे सर, प्रा. अमोल जाधव सर, हारदे सर, सोनवणे सर , श्रीखंडे मामा उपस्थिती होते.



## खुलताबाद येथे महाराष्ट्र दिनानिमित्त ध्वजारोहण

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** मा आ. प्रशांतजी बंब साहेब यानी आज 1 मे महाराष्ट्र दिनानिमित्त तहसिल कार्यालय खुलताबाद येथे सकाळी 8 वा ध्वजारोहण केले. या ध्वजारोहण प्रसंगी तहसिलदार सुरेंद्र देशमुख, पोलीस निरीक्षक भुजंग हातमोडे, गटविकास अधिकारी प्रवीण सुरडकर,कोलते साहेब,तालुकाध्यक्ष प्रकाश वाकळे, शहराध्यक्ष सतिश दांडेकर, जि.प. उपाध्यक्ष एल. जी. गायकवाड, उपाध्यक्ष सुरेश मरकड, दिनेश अंभोरे, परसराम बारगळ, योगेश बारगळ,संदिप निकम, तसेच विविध शासकीय अधिकारी, पदाधिकारी, कर्मचारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



# चित्रतपस्वी भालजी पेंढारकर



आधुनिक केसरी

**कोल्हापूरच्या तांबड्या मातीत अनेक हिरे जन्मले. त्यात छत्रपती शाहू महाराजांनी कोल्हापूर गाजवले. तेथे जन्मलेले भालजी पेंढारकर एक नररत्न होय. त्यांचा जन्म ३ मे १८९८ रोजी झाला. त्यानिमित्त त्यांना ही शब्दांजली.... कोल्हापूर ही कलावंतांची भूमी. तिथे भालजी पेंढारकर हा हीरा जन्मला. त्या दिगंत कीर्ती मिळविलेल्या कलाकाराने अनेकांचे पालन पोषण केले. आपल्या ऐतिहासिक व सामाजिक चित्रपटांनी गाजलेले भालचंद्र गोपाळ पेंढारकर ऊर्फ चित्रतपस्वी भालजी पेंढारकर अतिशय कडक शिस्तीचे निर्माते. मराठी चित्रपटसृष्टीला वरदानस्वरूप मिळालेले भालजी हे दिग्दर्शक व पटकथा आणि संवादलेखकही होते. भालजींना सारे बाबा म्हणत.**

गोव्याच्या सूनबाई माधवीताई देसाई त्यांच्या पोटी जन्मल्या होत्या. भालजी हे सर्व प्रकारची कामे करीत. त्यांच्या जयप्रभा स्टुडिओत त्यांनी केवळ मराठीतूनच नाही तर हिंदी, बंगाली, गुजराती व तामिळ आदी भाषांतून चित्रपटनिर्मिती केली.

छत्रपती शिवाजी महाराजांवर त्यांचे अतोनात प्रेम होते. छत्रपती शिवाजी, नेताजी पालकर, बहिर्जी नाईक, मराठा तितुका मेळवावा आदी चित्रपट त्यांनी शिवाजी महाराजांच्या प्रेमापोटीच काढले. मोहित्यांची मंजुळा असो की कालिया मर्दन हे त्यांनी तयार केलेले चित्रपट प्रचंड गाजले. अत्यंत कडवा देशप्रेमी असे त्यांचे वर्णन करता येईल. इंग्रज सत्तेविरुद्ध त्यांनी आपल्या चित्रपटांतून नेहमी सकारात्मक संदेश दिला.

सूर्यकांत, चंद्रकांत हे दोघे बंधू तसेच सुलोचना व जयश्री गडकर या त्यांच्या तालमीत तयार झाल्या होत्या. त्यांनी अनेक कलाकारांना आश्रय दिला.

तांबडी माती हा त्यांचा खूप गाजलेला चित्रपट. या चित्रपटाला अनेक पुरस्कार लाभले. सर्वोत्कृट कथा आणि संवादाचा राष्ट्रीय पुरस्कार पटाकावलेल्या या चित्रपटाने खूप कीर्ती मिळविली.साधी माणसं या चित्रपटाला आणि तांबडी मातीला राष्ट्रीय पुरस्कार रजत पदक मिळाले. शिवकाळ आणि शिवछत्रपतींच्या काळातील माणसांभोवती असलेली माणसे त्यांना प्रिय होती. अशीच पात्रे त्यांच्या चित्रपटांतून आली.

भालजींच्या "महारथी कर्ण" व "वाल्मिकी" या सिनेमातून भूमिका साकारत असतानाच अभिनेत्री लीलाबाईचे व त्यांचे प्रेम जुळले आणि त्याचे रूपांतर विवाहात झाले व लीला चंद्रगिरीच्या त्या लीला पेंढारकर झाल्या. या त्यांच्या तृतीय पत्नी होत. त्यांची प्रथम पत्नी -शांताबाई [सावित्री] होय. तर दुसरी पत्नी सरलाबाई. त्यांनी तिसरा विवाह केल्यानंतरही बकुळाबाईंबरोबर चौथा विवाह केला. जयसिंग,सदानंद, प्रभाकर, सरोज चिंदरकर, माधवी देसाई ही त्यांची पाच अपत्ये होत.

१९४८ मध्ये महात्मा गांधी यांच्या हत्येनंतर त्यांचा जयप्रभा हा स्टुडिओ समाजकंटकांनी जाळला. परंतु मोठ्या जिद्दीने लाखो रुपये जमवून त्यांनी परत तो उभा केला पहिल्याच दिमाखात. परंतु स्टुडिओ जळाल्याने त्या काळात त्यांच्या कडील दोनशे कामगारांना बेरोजगार व्हावे लागले. स्टुडिओ जळाला त्यावेळी मीठ भाकर आणि मेरे लाल हे चित्रपट तयार झाले होते. परंतु जळालेल्या स्टुडिओत तेही जळाले. परंतु खचून न जाता भालजींनी ते दोन्ही चित्रपट पुन्हा हिमतीने तयार केले. त्यांना जीवन गौरव, गदिमा पुरस्कार असे अनेक मानाचे पुरस्कार मिळाले. १९९१ मध्ये त्यांना दादासाहेब फाळके हा राष्ट्रीय पुरस्कार मिळाला. परंतु प्रकृती ठीक नसल्याने तो स्वीकारण्यास त्यांना जमले नाही. त्यामुळे त्या वेळचे माहिती आणि प्रसारण मंत्री अजित पांजा आणि महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यंत्री सुधाकरराव नाईक यांनी जयप्रभा स्टुडिओत जाऊन त्यांना हा पुरस्कार प्रदान केला.

दीर्घायुष्य लाभलेल्या २६ नोव्हेंबर १९९४ रोजी त्यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. स्वातंत्र्याचे सुराज्य निर्माण व्हावे अशी त्यांची भूमिका होती. त्याच धर्तीवरील चित्रपट त्यांनी निर्माण केले. त्यांनी निर्माण केलेले अनेक चित्रपट हे कृष्ण धवल म्हणजे ब्लॅक अँड व्हाइटच होते. तरीही प्रेक्षकांनी ते डोक्यावर घेतले. त्यांच्या चित्रपटातील गीते आजही तरुणांच्या ओठी रुळलेली आहेत. अत्यंत कठीण परिस्थितीने त्यांना घडविले. प्रख्यात गायिका लता मंगेशकर त्यांना खूप मानत. लतादीदींनी आनंदघन नावाने भालजींच्या काही चित्रपटांना संगीतही दिले आहे. स्वतः भालजी हे गीतकार देखील होते. योगेश या नावाने त्यांनी गीते लिहिली आहेत.साधी माणसं मधील ऐरणीच्या देवा तुला हे गीत आजही लोकप्रिय आहे.

भालजी पेंढारकर यांनी निर्माण केलेले काही चित्रपट आकाशवाणी, कान्होपात्रा, कालियामर्दन, गनिमी कावा, गोरखनाथ, छत्रपती शिवाजी, नेताजी पालकर, बहिर्जी नाईक, भक्त दामाजी, मराठी तितुका मेळवावा, महारथी कर्ण, मीठभाकर, मोहित्यांची मंजुळा, राजा गोपीचंद, वाल्मिकी , साधी माणसं, सावित्री, सुवर्णभूमी आदी त्यांनी निर्माण केलेले काही चित्रपट. अत्यंत साधा माणूस म्हणून नावाजलेले भालजींचे साधा माणूस हे आत्मचरित्र प्रसिद्ध आहे.



# विरोधकांना धोबीपछाड देत प्रसेनजित पाटील ठरले बाजीगर

आधुनिक केसरी न्यूज

**सागरकुमार झनके**

**जळगाव जा :** ३० एप्रिल रोजी जळगाव जामोद कृषी उत्पन्न बाजार समितीच्या १८ जागेसाठी मतदान झाले आणि त्याच दिवशी ५ वाजता मतमोजणीही झाली.

१८जागांसाठी झालेल्या या अटीतटीच्या निवडणुकीत प्रसेनजीत पाटील यांच्या शेतकरी सहकार विकास आघाडीच्या ११ उमेदवारांचा विजय तर आमदार,डॉ. संजय कुटे, प्रकाश पाटील, स्वातीताई वाकेकर यांच्या पक्षविरहित शेतकरी विकास पॅनलच्या सात उमेदवारांचा विजयी झाला आहे. ग्रामपंचायत मतदार संघातून शेतकरी सहकरी सहकार विकास आघाडीचे महादेवराव भालतडक, उल्हास माहोदे, ग्रामपंचायत मागासवर्गीय मतदार संघातून प्रमोद अवसरमोल हे विजयी झाले. हमाल मापारी मतदारसंघातून ह्याच शेतकरी विकास सहकार आघाडीचे माणिकराव नामदेव वाघ तर व्यापारी मतदारसंघातून सौ. मनोरमा अशोक दैय्या ह्या विजयी झाल्या आहेत. सेवा सहकारी मतदार संघातून याच पॅनलचे प्रसेंनजीत पाटील,दत्तात्रय पाटील, मनोहर पाटील, विश्वासराव भालेराव,देविदास पारस्कर,वंदना आटोळे, हे उमेदवार निवडून आले आहेत.राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश सरचिटणीस असलेले प्रसेनजीत पाटील यांच्या शेतकरी सहकार विकास आघाडीच्या पँनलला १८ पैकी ११ जागा मिळाल्या असून प्रसेनजीत पाटील यांनी कृषी उत्पन्न बाजार समितीवर पुन्हा एकदा विजयाचे निशाण फडकवले असून आपले वर्चस्व कायम ठेवले आहे.

खरे तर ही निवडणूक खूपच चुरशीची झाली होती. या निवडणुकीमध्ये प्रसेनजीत पाटील आणि शिवसेनेचे जिल्हा संपर्क प्रमुख दत्ता पाटील यांचे विरोधात सर्व एकत्र आल्यानंतरही या दोन्ही दिग्गजांनी आपला बालेकिल्ला अबाधित राखत १८ पैकी ११ जागेवर आपले उमेदवार विजयी केले आहेत. तर दुसरीकडे सेवा सहकारी मतदार संघात झालेल्या लढतीत पक्षवीरहीत शेतकरी विकास पॅनलचे माजी जि. प .अध्यक्ष प्रकाश पाटील ,रंगराव देशमुख, प्रभात पाटील ,अलका दीपक पाटील, निलेश चेतन साबे, हे सहकारी संस्था मतदार संघातून विजयी झाले तर भास्कर राऊत हे ग्रामपंचायत मतदार संघातून विजयी झाले. व्यापारी मतदारसंघातून पक्षविरहित शेतकरी पॅनलचे मनोज सत्यनारायण राठी असे सात उमेदवार विजयी झाले आहेत.१८ जागेवर झालेल्या ह्या निवडणुकीमध्ये शेतकरी सहकारी विकास आघाडीचे ११ उमेदवार तर पक्षविरहित शेतकरी विकास पॅनलचे सात उमेदवार विजयी झाले आहेत..

या निवडणुकीमध्ये पक्षविरीत पॅनलचे विजय डोंगरदिवे, पांडुरंग बावसकर, भाऊराव भालेराव, प्रकाश ढोकणे ,यमुनाबाई रोहनकर, रवींद्र उगले, ज्योती इंगळे, देवेंद्र भैय्या हे उमेदवार पराभूत झाले तर शेतकरी सहकार विकास आघाडीचे राजेंद्र देशमुख, विठ्ठल भिसे, दिवाणसिंग वाटपाळ, प्रमोद सपकाळ, वाघ, घुले हे उमेदवार पराभूत झाले आहेत. आपल्याला उमेदवारांना विजयी करण्यासाठी दोन्ही पँनलच्या दिग्गजांनी अहोरात्र मेहनत घेतली होती.

# कला महोत्सव काळाची गरज : कविवर्य नागेश शेलार

## वांबोरी कला महोत्सव; वांबोरीभूषण पुरस्कार वितरण

आधुनिक केसरी न्यूज

**वांबोरी :** ग्रामीण भागात आयोजित केलेले कला महोत्सव कार्यक्रम ही काळाची गरज असून त्यामुळे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना व्यासपीठ मिळते. भविष्यात याच कार्यक्रमातून विविध कलाकार नावारूपाला येतील व कला-साहित्य क्षेत्रात घवघवीत यश मिळवतील, असे प्रतिपादन ज्येष्ठ कवी नागेश शेलार यांनी व्यक्त केले. भानुदास सावळेराम व्यवहारे यांच्या स्मरणार्थ व वांबोरी साहित्य मित्र मंडळ आयोजित दुसऱ्या वांबोरी कला महोत्सवात कविवर्य नागेश शेलार बोलत होते. यावेळी विचारमंचावर गावचे सरपंच किरण ससाणे, ह.भ.प. ईश्वर महाराज कदम व स्वागताध्यक्ष डॉ. योगेश पानसरे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात प्रश्नमंजुषा कार्यक्रमाने झाली. या कार्यक्रमाचे उद्घाटन पत्रकार बाळासाहेब कांबळे यांच्या हस्ते झाले. प्रश्नमंजुषा कार्यक्रमाचे संचलन अर्चना मकासरे यांनी केले.त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते संदीप भांड,समर्थ शेवाळे, अचला झंवर, अशोक व्यास,विद्याधर कोटस्थाने, देविदास जवरे व दिलीप जवरे यांना वांबोरी भूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.यावेळी लेखक-कवी आशिष निनगुरकर यांच्या 'उजेडाच्या वाटा' या लेखसंग्रहाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.तसेच यावेळी वृक्षमित्र विद्यार्थी व सांस्कृतिक कार्यक्रमात सहभाग घेतलेल्या सर्व विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. कवी नागेश शेलार यांच्या कवितेला मोठ्या प्रमाणात दाद मिळाली.

यावेळी संदीप भांड व शंकर शेवाळे आदींची भाषणे झाली. नृत्य, गायन, वादन, एकपात्री, कविता व कथाकथन अशा विविध कार्यक्रमांची रेलचेल असलेला हा महोत्सव उत्तोरोत्तर रंगत गेला.साहित्य, प्रबोधन व पर्यावरण अशा विषयाशी जोडलेल्या या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी वांबोरी साहित्य मंडळाचे निवृत्ती पाटील, रोहिदास ससाणे, आदिनाथ मोरे, गणेश जगताप, आप्पासाहेब पागिरे, नासिर कोतवाल, इंद्रजित पाटील, विशाल दाते, स्वरूप कासार व संतोष महापुडे आदींचे विशेष सहकार्य लाभले. सूत्रसंचालन आदिनाथ मोरे तर आभार विशाल दाते यांनी मानले.




# दिंडोरी तालुक्यात दोन दिवसात दोन उपसरपंचांचे निधन; तालुक्यात हळहळ

आधुनिक केसरी न्यूज

**बंडू खडांगळे**

**दिंडोरी :** तालुका हा अनेक राज्यकर्ते पक्षाच्या नेत्यांची मिनी राजधानी म्हणून नावरूपास आहे. येथील अनेकांनी राज्यकारणांचा अभ्यास करून विविध पदावर विविध पदे भूषवित आहे. त्यामध्ये काही जि.प. सदस्य, पं.स. सदस्य, विविध बँकासंचालक, विविध संस्था, विविध कमेट्या इ.पदावर कार्यरत आहे. त्यामध्ये दोन नावांचा अशा उल्लेख पाहायला मिळतो की. तळेगाव येथील चंदुनाना चौधरी,व नळवाडी घनश्याम ( गणेश ) बाळासाहेब वाघ हे नावे सध्या तालुक्यातील राज्यकारणांत उभारी घेत असतांना ३० एप्रिल रोजी तळेगाव दिंडोरी येथील युवाकांचे आशास्थान व माजी उपसरपंच चंदुनाना चौधरी, यांचे अपघाती निधन झाले. तर नळवाडी येथील विद्यमान उपसरपंच घनश्याम( गणेश ) वाघ यांचे अचानक निधन झाल्याने तीन दिवसांच्या आंतराने दोन वेगवेगळ्या गावातील एका माजी व एका विद्यमान उपसरपंचाचे निधन झाल्याने संपूर्ण तालुक्यात हळहळ व्यक्त





केली जात आहे. दोन्ही उपसरपंचानी आपल्या कार्यकालामध्ये गावांच्या विकासांचे संकल्प हाती घेतला होता. व गाव विकास हाच आमुचा ध्यास ही संकल्पना पुर्ण करून दाखविली होती. परंतु तीन दिवसांच्या आंतराने दोन उपसरपंचाचे निधन झाल्याने तीव्र हळहळ व्यक्त केली जात आहे.

**राज्यकारणातील खलीचे निधन :** तळेगाव दिंडोरी येथील माजी उपसरपंच चंदुनाना चौधरी यांना गावांतील राज्यकारणांतील बलाढ्य खलीची उपमा दिली गेली होती . कारण चंदुनाना ची उंची साडे सात फुट उंच व वजन सुध्दा एकेश पंधरा किलोच्या वर होते . उपसरपंच असताना अनेक विकास कामे त्यांनी मार्गी लावले होते .

**भाऊलाल तांबडे ( सामाजिक कार्यकर्ते तळेगाव दिंडोरी )**

**विकासकामांचा आधार स्तंभ हारपला . . .**

नळवाडी येथील विद्यमान उपसरपंच घनश्याम वाघ हे गावच्या विकास कामात एक अग्रेसर नाव दिंडोरी तालुक्यात पुढे येत असतांना अचानक काळाने घाला घातल्याने जणू काही विकास कामाचा आधार स्तंभच हारपला आहे .

**ग्रामस्थ नळवाडी, ता .दिंडोरी .**